मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ | वर्षः १ | अंकः७२ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## 'मत चोरी'ची तक्रार करण्यासाठी वेबसाइट

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते राहुल गांधी बनावट मतदार यादीच्या मुद्द्यावरुन केंद्र सरकारवर सातत्याने टीका करत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रविवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत म्हटले की, मतांची चोरी हा 'एक व्यक्ती, एक मत' या मूलभूत लोकशाही तत्त्वावर हल्ला आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी स्वच्छ मतदार यादी आवश्यक आहे. आमची मागणी आहे की, निवडणूक आयोगाकडे पारदर्शकता दाखवून डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करावी, जेणेकरून जनता आणि राजकीय पक्ष स्वतः त्याचे ऑडिट करू शकतील. तुम्हीही आमच्यात सामील होऊन या मागणीला पाठिंबा देऊ शकता - http://votechori.in/ecdemand ला भेट द्या किंवा 9650003420 वर मिस्ड कॉल द्या. ही लढाई लोकशाहीच्या रक्षणासाठी आहे, असे ते म्हणाले.

## अग्रलेख — खरीखरी

### २५ टक्के भुर्दंडाचे गूढ

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आम्ही तुघलक म्हणतो. त्यांनी भारतावर पुन्हा हल्ला केलेला आहे. आपण रशियाकडून क्रूड ऑईल खरेदी करतो हा आपला घनघोर अपराध आहे असा त्यांचा दावा आहे आणि त्यांच्या मताप्रमाणे तो खराही असेल. कारण त्यांच्याच मताप्रमाणे भारत आणि पाकिस्तान युद्ध आपणच थांबवले असा दावा त्यांनी जवळजवळ तीन डझन पेक्षा जास्त वेळा केला. आता रशियाकडून जे क्रूड ऑईल आपण खरेदी करतो ते म्हणजे युद्धखोर रशियाला आपण मदत करतो, असा त्यांचा आरोप असून त्यावर आपण २५ % पेनल्टी लावल्याचा त्यांचा दावा आहे. हा डोनाल्ड ट्रम्प नावाचा प्राणी कसाही असेल तरी रशियातून क्रूड ऑईल खरेदी करण्याच्या भारतीय धोरणाचा भारताला कितपत फायदा होतो, याचा विचार आपण आता करूया. म्हणजेच ट्रम्प यांच्या २५ % कर वाढीचा फटका देशातील अनेक निर्यातदारांना बसणार आहे त्यामुळे त्यांच्यावर कठीण प्रसंगही येणार आहे. हजारो कर्मचारी यामध्ये बेकार होऊ शकतात. आपले पंतप्रधान म्हणतात की आपल्या देशातील जनतेच्या हिताकरिता मी आपला वैयक्तिक तोटाही सहन करू शकतो हा वैयक्तिक तोटा म्हणजे काय याचाही खुलासा झाला पाहिजे. २५ फेब्रुवारी २०२२ पासून रशिया आणि युक्रेनचे जे युद्ध सुरू झालेय ते अजूनही सुरू आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी जगामध्ये ज्या तेलाच्या किमती आहेत त्याच किमतीमध्ये आपण रशियाकडून क्रूड ऑईलची आयात करत होतो. आपल्या एकूण आयातीच्या ०.२२% ईतकी आपली रशियाकडून ची आयात होती. त्यानंतर रशियाने २० ते ३० टक्के कमी दरामध्ये आयात करण्याची सूटयुक्त सोयी सुविधा आपल्याला दिली. रशियाला लढाइसाठी निधी हवा होता म्हणून कदाचित अशी सवलत त्यांनी दिली असावी. तोपर्यंत आपण तेलसमृद्ध मुस्लिम राष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करत होतो. आता या खरेदीची गंमत बघा, आपल्या सरकारच्या तीन कंपन्या आहेत. त्यामध्ये एक ईंडियन ऑइल कॉर्पोरेशन आहे, दुसरी बीपीसीएल आहे आणि तिसरी अजून एक महत्त्वाची कंपनी आहे, त्यासह अजूनही एक कंपनी हे काम करते असे सांगण्यात येते. या कंपन्या एकूण आयातीच्या फक्त २५% क्रूड ऑईल आयात करत होत्या. यांच्यापैकी ७५ टक्के क्रूड ऑईल रशियाकडून आयात करण्यामध्ये ज्या दोन कंपन्या महत्त्वाच्या होत्या. त्यापैकी एक नायरा आहे आणि दुसरी रिलायन्स आहे. या दोन गुजराती कंपन्यांनी ७५ टक्के क्रूड ऑईल खरेदी केले आणि ते रिफाईंड करून युरोपियन कंपन्यांना आणि देशांना पुरवले. काही दिवसांपूर्वी अमेरिकेने नायरावर बंदी घातली कारण त्यात काही रशियन संचालक सामील होते. अंबानीच्या रिलायन्सला अगदी आत्ता आतापर्यंत मुक्तद्वार होते. आताची परिस्थिती काहीही असले तरीही यापूर्वी केवळ अंबानीच्या कंपनींना या निर्यातीतून सहाशे अब्ज रुपयांचा फायदा झाला आहे. दुसऱ्या गुजराती कंपनीचा आमच्याकडे तपशीलवार आकडा नाही. म्हणजेच दोन गुजराती कंपन्यांसाठी आपल्या संपूर्ण देशावर २५% कर दंड आकारण्यात आला आहे. आता गुजरात सुद्धा आपल्या देशातच आहे. या चार गुजराती कंपन्यांची भरभराट म्हणजे देशाची भरभराट समजावी आणि आपण आनंदित राहावे. कारण बिचाऱ्या असलेल्या या तीन सरकारी कंपन्यानी देशातील अतिश्रीमंत, श्रीमंत मध्यमवर्गीय किंवा सामान्य अशा कोणत्याही वर्गाला एका पैशाचाही फायदा दिलेला नाही म्हणजेच त्यांनी फक्त आपला आणि आपलाच नफा वाढवलेला आहे. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे यामुळे भविष्यात किती कंपन्यांचे बारा वाजतील याचा अंदाज आत्ताच न केलेला बरा, अशी रशियाच्या क्रूड ऑईलच्या गुढ आयातीची क्रूड कथा आहे.

जय गुजरात! जय भारत!!


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# 13 ऑगस्टपासून जैन समाजाचा उपोषणाचा इशारा

## आमच्या धर्माविरोधात जाणार असाल तर न्यायालयाला मानत नाही; जैन मुनींची धमकी

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

मुंबईतील कबुतरखान्यांच्या परिसरात पक्ष्यांना खाणे टाकू नये, असा आदेश उच्च न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर आता जैन समाज आक्रमक झाला आहे. न्यायालयाच्या बंदीनंतरही जैन समाजातील व्यक्तींनी दादर कबुतरखान्याच्या परिसरात पक्ष्यांना खाणे टाकले होते. मात्र, पोलिसांनी त्यांना तात्काळ इंगा दाखवला होता. त्यामुळे आता जैन समाजाने उपोषणाचे आणि आंदोलनाचे हत्यार उपसणार असल्याचे जाहीर केले आहे. येत्या १३ तारखेपासून कबुतरखाने बंद करण्याच्या निर्णयाविरोधात जैन समाज उपोषणाला बसेल, अशा इशारा जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी दिला. एवढेच नव्हे तर वेळ पडल्यास शांतताप्रिय असणारा आमचा समाज शस्त्रंही हातात घेईल आणि कोर्टाच्या आदेशालाही जुमानणार नाही, अशी धमकी जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी दिली.

आम्ही सत्याग्रह आणि उपोषणाचा मार्ग वापरणार आहोत. जैन समाज शांतताप्रिय आहे. शस्त्र उचलणे आमचं काम नाही. जे लोक शस्त्र उचलतात, ते आमचे नाहीत. पण गरज पडली तर आम्ही धर्मासाठी शस्त्रं पण उचलू. आम्ही भारताचं संविधान मानतो ना, कोर्टाला मानतो ना, देवेंद्र फडणवीसला मानतो ना. पण आमच्या धर्माच्या विरोधात आलं तर आम्ही कोर्टालाही मानत नाही, असे निलेशचंद्र विजय यांनी म्हटले. हे प्रकरण न्यायालयात सुरु आहे. कबुतरं मरता कामा नयेत. सरकारच्या आदेशानंतर पक्षांना खाद्य टाकणं सुरू झाले आहे. निवडणूक डोळ्यांसमोर



ठेऊन हा सगळा प्रकार सुरु आहे. आमचं पर्युषण पर्व संपल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ. आता आम्ही शांत बसणार नाही. १३ तारखेला आम्ही उपोषण सुरु करु. देशभरातली जैन बांधव आंदोलनासाठी इथे येतील. जीव दया आमच्या धर्मात आहे, जैन धर्माला का लक्ष्य केले जात आहे? मी एकटा आंदोलनाला बसणार नाही. देशभरातली १० लाख जैन बांधव इकडे उपोषणाला बसतील, असा इशारा निलेशचंद्र विजय यांनी दिला. दारु आणि कोंबड्या खाऊन किती लोक मरतात, हेदेखील दाखवा. आम्ही पालिकेकडे कबुतरांना खाद्य द्यायला परवानगी मागितली आहे. मुंगीपासून ते हत्तीपर्यंत कोणताही जीव मरता कामा नये, हे आमच्या धर्मात लिहिलं आहे, असेही जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता नवा वाद पेटण्याची शक्यता आहे. यावर आता मनसे आणि ठाकरे गट काय भूमिका घेतात, हे पाहावे लागेल.

# जगदीप धनखड गायब ?

## रशिया-चीनची पद्धत भारतात सुरू केली का? - राऊत

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

देशाला अजूनही उपराष्ट्रपती नसल्यामुळे आजही आम्ही जगदीप धनखड यांनाच उपराष्ट्रपती मानतो. जगदीप धनखड हे २१ जुलैपासून बेपत्ता आहेत. देशाची उपराष्ट्रपती असलेली व्यक्ती, राज्यसभेचे चेअरमन २१ जुलै रोजी सकाळी राज्यसभेत आमच्यासमोर आले. त्यांची आमची चर्चा झाली. त्यांनी काही आदेश दिले, त्यानंतर सभागृह स्थगित झाले. त्यांची प्रकृती उत्तम होती, खणखणीत होती. ते काही काळ चिडले असतील, हास्यविनोद केले असतील, त्यांनी संवाद साधला आणि संध्याकाळी सहानंतर बातमी आली की, जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणास्तव उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. हे आमच्यासाठी अत्यंत धक्कादायक आहे, इथपर्यंत आम्ही सहन करू शकतो. पण, जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यापासून आजपर्यंत ते आहेत तरी कुठे? असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला.



संजय राऊत पत्रकारांशी बोलत होते. जगदीप धनखड यांच्या प्रकृतीची काय स्थिती आहे? ते काय करत आहेत? ते कोणाबरोबर आहेत, त्यांचा मुक्काम कुठे आहे? ते बरे आहेत ना? मुळात ते आहेत ना की त्यांना कुठे गायब केले आहे का? या शंका आमच्या मनात येत आहेत. देशाचे माजी उपराष्ट्रपती अशा प्रकारे गायब झाले असतील आणि त्याचा ठावठिकाण कोणाला लागत नसेल, तर देशाच्या लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. अशा प्रकारे आपल्याला नको असलेले नेते गायब करण्याची पद्धत रशिया आणि चीनमध्ये आहे आणि त्यातील काही परंपरा या लोकांनी नव्याने सुरू केली आहे का? उद्धव ठाकरे दिल्लीला आले असताना कपिल सिब्बल हे उद्धव ठाकरेंना भेटले, तेव्हा आम्ही चर्चा केली. तेव्हा आमचे असे ठरत आहे की, आम्ही न्यायालयात याचिका दाखल शकतो, असे संजय राऊत यांनी सांगितले.

# पुणे ते नागपूर 12 तासांत

**नागपूर , दि. १० प्रतिनिधी**

विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या अजनी–पुणे वंदे भारत एक्सप्रेसचे आज उद्घाटन झाले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या वंदे भारत एक्सप्रेसमुळे पुणे ते नागपूर हे अंतर आता केवळ १२ तासांत पार होणार आहे. या उद्घाटनप्रसंगी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी नगर ते पुणे रेल्वेही सुरु होणार असल्याचे सांगितले आहे.

"आज आपल्या सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे. मी स्वतः रेल्वे मंत्र्यांना विनंती केली होती. नागपूर ते पुणे प्रचंड ट्रॅफिक आहे. त्यामुळे एक वंदेभारत एक्सप्रेस सुरु



केली पाहिजे. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि आज नागपूर- पुणे वंदे भारत ट्रेन सुरू होत आहे. हा वंदे भारतचा सर्वात लांब पल्ल्याचा मार्ग आहे. अतिशय वेगाने आणि चांगल्या सोईयुक्त नागपूर आणि पुण्याच्या प्रवाशांना यामधून प्रवास करता येणार आहे. केवळ १२ तासात हा प्रवास होईल. या वंदेभारत ट्रेनसाठी पंतप्रधान मोदी आणि रेल्वेमंत्र्यांचे आभार, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणालेत.

"आता नगरवरुन ट्रेन दौंडला जाते आणि दौंडवरुन पुण्याला जाते. त्यामुळे मी नगरवरुन थेट पुण्यासाठी रेल्वे असावी असे मी सूचवले आहे. पुढच्या काळात त्यासंदर्भात निर्णय होईल. संभाजी नगर ते अहिल्यानगर ते पुणे हा नवीन एक्सप्रेस वे करत आहोत.. त्या बाजूने रेल्वे मार्ग केल्यास नागपूर ते पुणे अंतर शंभर किमीपेक्षा अधिक अंतर कमी होऊ शकते. त्याकडे लक्ष घालून आम्ही रेल्वेसोबत बोलण्याचे काम करत आहोत. त्यांनी एक आढावा केली आहे. पण आमची जमीन अधिग्रहण आधीच होत आहे, त्यामुळे आमचे अधिग्रहण रेल्वेने स्वीकारावे त्याद्वारे नव्याने जमीन अधिग्रहण करावी लागणार नाही, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

### ११ वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था १०व्या स्थानावरून पाचव्या स्थानावर - पंतप्रधान

बंगळुरु मेट्रोने देशाला विकासाचं नवं उदाहरण घालून दिलं आहे. CSR च्या मदतीने उभारण्यात आलेली ही मेट्रो एक उत्तम उदाहरण आहे. मी कॉर्पोरेट सेक्टरचेही आभार यासाठी मानतो. आज भारत जगातली वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. मागच्या ११ वर्षात आपली अर्थव्यवस्था १० व्या क्रमांकावरुन पहिल्या पाचात आली आहे. लवकरच पहिल्या तीन अर्थव्यवस्थांमधला एक देश भारत असणार आहे. २०१४ मध्ये फक्त पाच शहरांमध्ये मेट्रो धावत होती. आज ११ वर्षांनी देशातल्या २४ शहरांमध्ये मेट्रोचं जाळं उभारण्यात आलं आणि ते विस्तारण्यात आलं आहे. भारत आता जगातला मेट्रोचं जाळं असलेला तिसरा देश झाला आहे. २०१४ पर्यंत भारतात फक्त ७४ विमानतळ होती. आता ही संख्या १६० च्याही पुढे गेली आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

# 'विश्वगुरू' बनवायचे असेल, तर निर्यात वाढवणे आणि आयात कमी करणे खूप महत्वाचे – गडकरी

**नागपूर, दि. १० वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील कर अचानक वाढवल्याने, गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र गोंधळाचे वातावरण आहे. तशातच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेत (व्हीएनआयटी) आपल्या भाषणात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व सांगतानाच, निर्यात वाढवण्याची गरज असण्यावरही भर दिला. आज दादागिरी करणारे देश हे आर्थिकदृष्ट्या मजबूत असल्याने आणि त्यांच्याकडे नवीन तंत्रज्ञान असल्याने ते असे करू शकतात, असे गडकरी म्हणाले. भारताने निर्यात वाढवण्यावर आणि आयात कमी करण्याच्या गरजेवर गडकरी यांनी भर दिला. जर आपल्याला भारताला 'विश्वगुरू' बनवायचे असेल, तर निर्यात वाढवणे आणि आयात कमी करणे आपल्यासाठी खूप महत्वाचे आहे, असे



गडकरी यांनी आपल्या भाषणात सांगितले.

"जर आपला निर्यात दर आणि अर्थव्यवस्थेचा दर वाढला, तर आपल्याला कोणापुढे हात पसरायची जाण्याची गरज भासणार नाही. जे देश दादागिरी करत आहेत, ते असे करत आहेत, कारण ते आर्थिकदृष्ट्या मजबूत आहेत आणि त्यांच्याकडे अत्यधुनिक तंत्रज्ञान आहे. आपल्याला चांगले तंत्रज्ञान आणि संसाधने मिळाली तरी आपण कोणावर दादागिरी करणार नाही, कारण आपली संस्कृती आपल्याला शिकवते की जगाचे कल्याण सर्वात महत्वाचे आहे," असे गडकरी म्हणाले.

गडकरी म्हणाले, "जागतिक स्तरावर आपल्याला विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आपल्या सर्वांनाच माहिती आहे की, या सर्व समस्यांवर विज्ञान आणि तंत्रज्ञान हाच उपाय आहे. हे सारे ज्ञान तर आहेच, पण त्यातून शक्ती आणि सामर्थ्यही मिळेल, जे आपल्याला या समस्येतून बाहेर पडण्यास मदत करेल."

"आपल्याला भारताला 'विश्वगुरू' बनवायचे असेल तर निर्यात वाढवणे आणि आयात कमी करणे खूप महत्वाचे आहे. संशोधन संस्था, आयआयटी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांनी देशाच्या गरजा लक्षात घेऊन संशोधन करावे. इतर क्षेत्रातील संशोधन देखील तितकेच महत्त्वाचे आहे," असे रोखठोक विधान त्यांनी केले.

# JSW कंपनीच्या विस्ताराने पेण तालुक्याचा कायापालट होणार

## पुन्हा हजारो स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार

**पेण दि. १०**
**समीर घायतळे**

१९९१ साली निप्पॉन डेंड्रो या नावाने स्थापन झालेल्या कंपनीचा विस्तार आज महाकाय अशा जे.एस.डब्ल्यू. कंपनीमध्ये झालेला आहे. आज या कंपनीमध्ये हजारो कामगार कॉन्ट्रॅक्ट कंपनीच्या माध्यमातून काम करीत आहे.

१९९१ साली स्थापन झालेले या कंपनीचा आतापर्यंत दोनदा विस्तार करण्यात आला आहे प्रत्येक विस्तारानंतर कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात नोकर भरती करण्यात आली आहे त्यामुळे येथील स्थानिक कामगारांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झालेल्या आहेत. तसेच कंपनीच्या विस्तार होत असताना अनेक स्थानिकांना वेगवेगळ्या प्रकारचे कामे केली जातात या कामांच्या माध्यमातून सुद्धा उत्पन्नाचे साधन व नवीन कामाच्या संधी उपलब्ध होतात. रायगड जिल्ह्यामध्ये महाड, रोहा, रसायनी खालापूर येथे एमआयडीसी असल्याने वेगवेगळ्या कंपन्यांनी आपले कामकाज तेथे सुरू केल्यानंतर त्या तालुक्यातील हजारो लोकांच्या हताला काम मिळाले व आर्थिक प्रगती झाली त्याचप्रमाणे पेण तालुक्यातही जेएसडब्ल्यू कंपनीमुळे तालुक्याचा आर्थिक विकास होऊन तालुक्याचा चेहरा मोहराच बदलला आहे. आत्ता कंपनी तिसऱ्या टप्प्याचा विस्तार करीत असताना याकरिता कंपनी हजारो कोटी रुपयांचा खर्च करणार आहे . या निधीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा तालुक्यातील व्यावसायिकांना व ठेकेदारांना तसेच थेट फायदा कामगारांना होणार आहे. ज्याप्रमाणे कंपनीचा विस्तार होईल त्याच प्रमाणात कंपनीचा व्यवसायही वाढेल. उत्पादन वाढवण्याकरिता कामगारांची गरज लागते. त्यामुळे कपनज्याप्रमाणे कंपनीचा विस्तार होईल त्याच प्रमाणात कंपनीचा व्यवसायही वाढेल. उत्पादन वाढवण्याकरिता कामगारांची यांची गरज लागते. त्यामुळे कंपनी वेळोवेळी कामगार भरती करीत असते. कंपनीच्या वतीने तालुक्यात विविध ठिकाणी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात या उपक्रमांतर्गत सभोवतालच्या गावांमध्ये समस्या सोडविण्यात येतात. हे सर्व सामाजिक उपक्रम कंपनीच्या सीएसआर फंडातून राबविण्यात येतात याकरिता कोट्यावधी रुपयांचा निधी कंपनी दरवर्षी उपलब्ध करून देते. या अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा दर्जा सर्वोत्तम कसा राहील याकरिता जातीने लक्ष घालते.

पेण तालुक्याच्या सर्वांगीण विकासामध्ये कंपनीचा सिंहाचा वाटा असून तालुक्यातील नागरिकांचे उत्पन्न सुद्धा कंपनीच्या माध्यमातून वाढले आहे. जे एस डब्ल्यू कंपनीचा विस्तार व्हावा अशी तालुक्यातील अनेक युवकांची इच्छा आहे, कारण या माध्यमातून या सुशिक्षित युवकांना पेण तालुक्यातच रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येथेच राहुन त्यांना आई-वडिलांची सेवा व कंपनीचे काम करता येईल. पेण तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्या करिता कंपनीचा विस्तार होणे हे काळाची गरज असून या माध्यमातून तालुक्यातील नागरिकांचाही विकास होणार आहे. अशी चर्चा सध्या विविध समाज माध्यमांवरती होत असून कंपनीच्या जनसुनावणीच्या वेळी कंपनीच्या विस्तार व्हावा या मागणी करिता अनेक स्थानिक आपला आवाज बुलंद करणार आहेत असेच चित्र सध्या दिसत आहे.


## प्रधानमंत्री पीक विमा योजना

www.pmfby.gov.in

UIN: IRDAN126RP0001V01201617

(भारत सरकार व महाराष्ट्र शासनाची योजना, एआयसी द्वारा लागू)

फसल बीमा कराओ सुरक्षा कवच पाओ

**खरीप 2025**

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

**खरीप हंगाम विमा योजनेतील पिके:** भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल.



**महत्त्वाच्या बाबी**

- अंतिम मुदतः **१४ ऑगस्ट २०२५**
- योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे.
- अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात.
- कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे.
- ई पीक पाहणी व विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल व भरलेला विमा हप्ता जप्त होईल.
- विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागात दिले जाते त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये.
- एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.
- मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे.
- सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के.

**उंबरठा उत्पादन**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची पाच वर्षांच्या सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीम स्तर विचारात घेऊन निश्चित केला जातो.

**विमा संरक्षणाच्या बाबी:**

पीक पेरणी पासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.

**विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे?**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे.

बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरून सहभाग घ्यावा. याशिवाय कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. भाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई पीक पाहणी नोंद पूर्ण करावी

योजनेच्या माहितीसाठी संपर्क पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाई माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क करावा, किंवा संबंधित विमा कंपनी प्रतिनिधि, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा

| जिल्हे | विमा कंपनी |
| --- | --- |
| अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा, वाशिम, बुलढाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली | एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड |

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करावा.



HO/25-26/1A/16

भारतीय कृषी बीमा कंपनी® | AGRICULTURE INSURANCE COMPANY OF INDIA LTD

AIC कृषक यत्न रक्षणम् ग्रामीण अर्थव्यवस्था के संरक्षक

मुंबई क्षेत्रीय कार्यालयः "लोक चेंबर्स", मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ | मुख्य कार्यालयः प्लेट B & C, ५ वा मजला, ऑफिस ब्लॉक १. ईस्ट किडवाई नगर, नवी दिल्ली-११००२३

ईमेल: pikvima@aicofindia.com, वेबसाईट: www.aicofindia.com | सीआयएनः U74999DL2002PLC118123, आयआरडीएआयः 126

aicofindialtd aicofindia aicofindia

कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७

*केवळ जाहिरात

* केवळ जाहिरात (योजनेच्या सर्व अटी व शर्ती लागू).

फसल हो या कृषि संपदा । बीमा सुरक्षा हमारा वादा ॥

विमा आग्रहाची विषय वस्तू आहे

# बाल शिक्षण मंदिरात आदिवासी दिन, क्रांती दिन साजरा

## वारली चित्रकला कार्यशाळेने वाढले विद्यार्थ्यांचे कलाप्रेम

**नाशिक ।** जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या बाल शिक्षण मंदिर गोरेराम लेन नाशिक येथे एक अनोखी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत आदिवासी जीवनावर आधारित वार्ली चित्र शैलीचे सविस्तर प्रदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक के.के. तांदळे यांनी आदिवासी जननायक व क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून केली. त्यांनी विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांच्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भगतसिंह, राजगुरू, सुखदेव, लोकमान्य टिळक, सुभाष चंद्र बोस, लाला लजपतराय यासारख्या महान क्रांतिकारकांची वेशभूषा धारण करून त्यांचे व्यक्तिमत्त्व सादर केले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी आदिवासींच्या पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला. कलाशिक्षिका सविता पेखळे यांनी वार्ली चित्रकलेचे प्रात्यक्षिक करून दाखवले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून वेगवेगळ्या प्रकारे वार्ली चित्रकला साकारली. या पारंपरिक कलाशैलीद्वारे विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती आणि जीवनशैलीची




ओळख करून देण्यात आली.

वार्ली चित्रकला ही महाराष्ट्रातील आदिवासी समुदायाची एक अनमोल कलाकृती आहे. या चित्रकलेत नैसर्गिक रंगांचा वापर करून दैनंदिन जीवन, त्योहार, लग्न-विवाह आणि शेती या विषयांवर आधारित चित्रे काढली जातात. विद्यार्थ्यांना या कलेच्याद्वारे आदिवासी समाजाची समृद्ध परंपरा आणि संस्कृतीची जाणीव मिळाली. या कार्यशाळेत शाळेचे माननीय मुख्याध्यापक के.के. तांदळे यांनी आघाडीची भूमिका पार पाडली. त्यांच्यासोबत ज्येष्ठ शिक्षक बाळकृष्ण बदादे, संगिता बोरसे, वैशाली गावले , जयश्री आहेर , चित्रा कडलक, प्रगती गायकर यांनी सक्रिय सहकार्य केले. आदिवासी जीवनावर आधारित माहिती श्रीमती शेवाळे यांनी सांगितली तर क्रांतिकारकांविषयी विस्तृत माहिती बदादे यांनी विद्यार्थ्यांना दिली. आदिवासी दिन व क्रांती दिन याचे सुंदर फलक लेखन सविता पेखळे यांनी केले होते. मुख्याध्यापक के.के. तांदळे यांनी सांगितले की, "जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेली ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत शिक्षणप्रद ठरली आहे. वार्ली चित्रकलेद्वारे त्यांना आदिवासी समाजाची संस्कृती समजून घेण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाद्वारे आमचे विद्यार्थी विविध कलाप्रकारांशी परिचित होत आहेत. या दिवशी आदिवासी दिनासोबतच क्रांती दिनही साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांची वेशभूषा करून त्यांच्या योगदानाचे स्मरण केले. बिरसा मुंडा यांच्यासह भगतसिंह, राजगुरू, सुखदेव, लोकमान्य टिळक, सुभाष चंद्र बोस, लाला लजपतराय यांच्या रूपात विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसेनानींना अभिवादन केले. देशभक्ती आणि त्यागाचे संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले. शैक्षणिक संस्थेने अशा प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये कलाप्रेम आणि संस्कृतीप्रेम जोपासण्याचे काम केले आहे. या कार्यशाळेत सहभागी झालेले सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांनी या अनुभवाला अत्यंत समाधानकारक मानले आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या शैक्षणिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याची योजना आहे.

# गोडगे पाटील पब्लिक स्कूलला जागतिक आदिवासी दिन साजरा



**वावी ।** येथील आर पी गोडगे पाटील पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज मध्ये शनिवार दि. ०८ रोजीजागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

आदिवासी विकास विभागाने शाळेला नामांकित दर्जा दिलेला असून, शाळेत सुमारे 350 आदिवासी विद्यार्थी निवासी आहे या विद्यालयात ज्युनियर के जी पासून ते इयत्ता 12 वी पर्यंत चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग आहेत हे विद्यार्थी परिसरातील नियमित विद्यार्थ्यां बरोबर इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेत आहे. 9 ऑगस्ट रोजी विद्यालयात जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने या आदिवासी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची गाणी सादर केली व आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सुरवातीला बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सी.ई.ओ. डी आर मुरकुटे यांनी केले. यावेळी प्राचार्य श्रीमती अनिता शिंगोटे व मुख्याध्यापक श्री जगदीश गोडगे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक श्रीमती किरण कुर्हे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक समितीचे किशोर सोनवणे, प्रियंका वारुळे, मनीषा ढमाले, रुपाली दांगट, वैशाली गोडगे, किसन बोंबले, गणेश हांडोरे, सोमनाथ कुर्हे, कैलास गवळी व ऋषिकेश खापरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

## रॅलीतून नृत्य, कला, वाद्य, पेहरावातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन

**नाशिक ।** कला,संस्कृती आणि आदिवासी वेशभूषा धारण करून पारंपरीक वाद्यावर नृत्य सादर करत शोभायात्रेतून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडले. सातपुडा आदिवासी पावरा समाज विकास संस्था आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषेदेने काल (दि.९) शनिवारी जागतीक आदिवासी दिनानिम्मित शहरात शोभायात्रेचे आयोजन केले होते.

पंचवटी कारंजा ते गोल्फ क्लब मैदानपर्यंत वाजत गाजत ही शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत पारंपरीक एक तीर एक कमान, सारे आादीवासी एक समान, हर हर महादेवच्या घोषणानी यावेळी, परीसर दुमुदुमुन गेला होता.चौका चौकात असलेल्या महापुरूषांच्या



पुतळ्यांना आदिवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आ.हिरामन खोसकर, नितीन पवार, माजी आमदार निर्मला गावीत, भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष लकी जाधव, गणेश गवळी, लक्ष्मण खराटे, यांच्या नेतत्वाखाली ही भव्य शोभायात्रा काढण्यात येऊन समारोप गोल्फ क्लब मैदानावर झाला.

# जिल्हा परिषद शाळा नाईकवाडी येथे आदिवासी दिन साजरा

**दिंडोरी ।** जिल्हा परिषद शाळा नाईकवाडी येथे आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी गावातून आदिवासी दिंडी काढण्यात आली. या कार्यक्रमात सरपंच भारती बदादे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ खोसकर, विलास




बदादे, सुकदेव खोसकर, लालूभाऊ गायकवाड, संदीप गायकवाड, मुख्याध्यापक राजेंद्र शेवाळे आदींसह शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जननायक बिरसा मुंडा व राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प हार अर्पण करण्यात आले.विकास खैरनार यांनी शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी गावाची एकजुट, बालविवाह, बालतस्करी, बालमजूरी , मुलांचे शोषण, शाळेतील भौतिक सुविधा व गुणवत्ता पूर्ण शिक्षण या विषयावर मार्गदर्शन केले, जाधव सरांनी आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यार्थ्यांनी आदिवासी गिते सादर केली. नृत्य गाण्यांचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षिका स्मिता पाटील,हेमलता भोये, सुनिता बदादे यांनी परिश्रम घेतले.

# मातोश्री सावित्रीबाई फुले विद्यालयात आदिवासी दिन साजरा



**नाशिक ।** वसुंधरेचा सेवा जपत सृष्टीचा सन्मान राखणारा निसर्गाच्या रक्षणासाठी नेहमी तत्पर असणारा आदिवासी म्हणून गर्व असलेल्या आदिवासी बद्दल निष्ठा भाव जपत पखाल रोडवरील मातोश्री सावित्रीबाई फुले विद्यामंदिरात जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक सुनील शेवाळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. क्रांती दिन रक्षाबंधन आणि आदिवासी दिन यांचे महत्त्व प्रशांत गवळी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त करताना शौर्य, प्रेम, आणि त्याग यांच्या विचारांची पूजा आपण केलीच पाहिजे असे सांगितले. आदिवासी वेशभूषेत आलेले विद्यार्थी आणि त्यांनी आदिवासी नृत्यद्वारे आदिवासी जीवनाचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत खैरनार यांनी केले. तर सूत्रसंचालन संगीता महाजन यांनी तर आभार जयश्री पवार यांनी मानले. यावेळी मोहन माळी, विद्या महाजन, ज्योती महाले, नीलिमा पडोळ, अश्विनी डांगरे लक्ष्मण काशीद यासह पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक प्रमुख वैशाली राजभोज यांनी केले.

# पेठच्या कोटंबी घाटात आयशर वाहनास लागली आग

**पेठ ।** नाशिक पेठ राष्ट्रीय महामार्गावरील कोटंबी घाटाचत नाशिक कडून गुजरातकडे जाणारा मालवाहु आयशर ट्रक क्रमांक जी.जे ०४ ए.एस ७७ दि ७ तारखेला सायंकाळी सुमारे पाच वाजेच्या दरम्यान अचानक पुढील बाजुने पेट घेतल्याने आगीचे लोळ उडून लागल्याने काही काळ वाहतुक खोळंबली होती.या वाहनात फर्निचरचे साहीत्य होते. पेठ पोलिसांना सदरील घटनेची माहीत मिळताच पोलीस निरीक्षक द्वारकानाथ गोंदके यांचे सह सर्व सहकारी घटनास्थळी पोहचत वाहतूक सेवा सुरळीत ठेवली.

पेठ नगरपंचायतीचे नगराध्यक्ष करण करवंदे यांनी तात्काळ नगरपंचायतीचे अग्निशामक दलाचे वाहन पाठवून आग आटोक्यात आणली. या आगीत कोणतीही



जीवित हानी झाली नसली तरी वाहनाचे व फर्निचर मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अग्निशामक दलाच्या वाहनाचे चालक शाकिब शेख समाधान पगारे, राहुल गायकवाड, सिकंदर काबळे, संदीप पगारे यांनी मदत कार्य करत वाहनाची आग शमविण्याचे काम केले.

# मैत्रीसाठी चित्त शुद्ध हवे : प्रा. संदीप जगताप

**नाशिक ।** हे जग स्पर्धेचे आहे. सर्वच क्षेत्रात स्पर्धा सुरू आहे. ती मैत्रीत देखील आली आहे. म्हणून या कठीण काळातच मैत्री जपता आली पाहिजे. उत्तम मित्रांचा संग्रह करण्यासाठी आपले चित्त शुद्ध हवे, तरच मैत्री टिकते व ती मैत्री व्यापक होते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. संदीप जगताप यांनी व्यक्त केले.

नाशिक येथील सरस्वती नगर पंचवटी परिसरात ज्ञानवर्षा फाउंडेशनच्या वतीने मैत्री दिनाचे औचित्य साधून 'मैत्र जीवाचे' या विशेष व्याख्यान पर कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नायब तहसीलदार विजय कच्छवे, पंडितराव ढिकले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, प्राचार्य डॉ. दीपक कारे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय गव्हाणे, कवी संजय आहेर, पंढरीनाथ अनारसे, प्रा. डॉ. कल्पना अहिरे, आत्माराम वाघमारे, प्रा. डी. जी. गायकवाड आदी उपस्थित होते. प्रा. जगताप पुढे म्हणाले की खरी मैत्री जात,




धर्म, व्यवसाय बघत नाही. खऱ्या मैत्रीला अशा कृत्रिम सीमा नसतात. समाजाचा विकास करायचा असेल तर सर्व स्तरावरील शत्रुत्वभाव नष्ट होऊन मैत्र भाव जोपासला पाहिजे. परस्परांविषयी द्वेष, मत्सर हे मैत्रीच्या आड येणारे घटक आहेत. वस्तू, भौतिक संपत्ती, सौंदर्य, पद याचा अहंकार मैत्रीच्या आड येता कामा नये. मैत्री करताना निर्मळ भावनेने, शुद्धचिताने मैत्री केली पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केले. नायब तहसीलदार विजय कच्छवे म्हणाले की, खऱ्या मैत्रीचे संस्कार हे बालपणापासून होत असतात. चांगले मित्र हे संपत्ती सारखे असतात. ते सुखदु:खामध्ये आपल्या कामाला येतात. म्हणून प्रत्येकाने चांगल्या मित्रांचा संग्रह करावा. कवी संजय आहेर यांनी मैत्री वरील अनेक सुंदर रचना सादर करून मैत्रीचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पंडितराव ढिकले म्हणाले की, ज्ञानवर्षा फाउंडेशनने परिसरात साहित्यिक उपक्रम राबवून शहरवासीयांची बौद्धिक भूक भागवली आहे. असे उपक्रम समाजाला पुढे घेऊन जाणारे असतात.असे गौरव उद्गार काढून भविष्यात वेगवेगळ्या विषयांवर चांगले वक्ते बोलवून समाजाचे प्रबोधन करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी ज्ञानवर्षा फाउंडेशनचा भविष्यात साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, बालसंस्कार आदी क्षेत्रात विविध उपक्रम राबविणार आहे असा मानस व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. संपदा ढगे हिने करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा कोटकर यांनी केले, तर आभार प्रा. संदीप पुरकर यांनी मानले.

## महत्त्वाचे

### म्हसरूळ सार्वजनिक वाचनालयात जागतिक आदिवासी दिन साजरा

**नाशिक ।** येथील म्हसरूळ सार्वजनिक वाचनालयात (दि.९ ऑगस्ट) रोजी जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात आला.




म्हसरूळ सार्वजनिक वाचनालयाच्या वाचन कक्षात आयोजित जागतिक आदिवासी दिन कार्यक्रमात प्रारंभी वाचनालयाचे अध्यक्ष वसंत मोराडे,उपाध्यक्ष रवी पगारे,प्रमुख कार्यवाहक विनायक सूर्यवंशी,सहखजिनदार प्रकाश उखाडे यांच्या हस्ते आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा,राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितानी मनोगत व्यक्त करून आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांना क्रांतीवीर बिरसा मुंडा, तंट्या भिल, राघोजी भांगरे यांच्या जीवनावर आधारित वाचनालयाचे संचालक प्रशांत मोराडे व प्रकाश उखाडे यांनी माहिती दिली. या कार्यक्रमासाठी ग्रंथपाल वैशाली केकरे, सुर्यवंशी यांच्यासह परिसरातील नागरिक व वाचनालयाचे वाचक व कर्मचारी उपस्थित होते.

# पेठला जागतिक आदिवासी गौरव दिन उत्साहात

## हुतात्मा स्मारकात आदिवासी क्रांतीकारकांना अभिवादन । विविध आदिवासी पारंपरिक नृत्याच्या रॅलीने वेधले लक्ष





**पेठ ।** आदिवासी गौरव दिन म्हणून साजरा होणारा जागतिक आदिवासी दिन या दिनानिमित्त तालुकाभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . पेठ येथील हुतात्मा स्मारकात आदिवासी शहिद क्रांतीकारांना व महापुरुषांना अभिवादन करुन आदिवासी ध्वजाचे ध्वजारोहण करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. हुतात्मा स्मारका पासून विविध नृत्याविष्काराने सुरू झालेल्या रॅली दरम्यान अबाल वृध्दांसह महीलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून आदिवासी पारंपारीक नृत्यावर धरलेला ठेका लक्षवेधी ठरला. आदिवासी दिनाच्या व क्रांतिकारकांच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता.

बँड पथक व सनई, संबळ ढोलाच्या ताला सोबतच डारपी व इतर पारंपरिक वाद्यांवर धरलेला नृत्याविष्कार अशा उत्साहवर्धक वातावरणात रॅली येथील क्रांतिकारक देवाची राऊत चौकात येवून मिरवणुकीची सागंता करण्यात आली.

दरम्यान पंचायत समितीच्या प्रांगणात आयोजित आदिवासी सांस्कृतिक महारॅली व सभा नृत्यांच्या कार्यक्रमात तालुक्यातील विविध शालेय विद्यार्थी, कलापथके यांनी आपले कलागुण मंचावर सादर करीत आदिवासी गीतातून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात सहभागी प्रत्येक विद्यार्थांस कलापथकास मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय विविध संस्थांचे पदाधिकारी शासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारीवर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पेठ तालुका आदिवासी उत्सव समितीच्या पदाधिका-यांनी अधिक परिश्रम घेवून कार्यक्रम शांततेत यशस्वी पार पाडला. मिरवणुकी दरम्यान पेठ पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## महत्त्वाचे

### तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त सिटीलिंकतर्फे जादा बसेस

**नाशिक ।** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर म्हणजे लाखो शिवभक्तांचे श्रध्दास्थान. श्रावण महिन्यात येथील फेरीला देखील विशेष महत्व असल्याने तिस-या श्रावणी सोमवारी तर लाखो शिवभक्त त्र्यंबकेश्वरच्या दर्शनासाठी तसेच फेरीकरिता जात असतात. या भाविकांची कोणतीही गैरसोय होवू नये याकरीता नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकच्या वतीने जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक १० ऑगस्ट व सोमवार दिनांक ११ ऑगस्ट २०२५ असे सलग दोन दिवस या जादा बसेस सोडण्यात येणार आहे. सद्यस्थितीत नाशिकरोड ते त्र्यंबकेश्वर मार्गे निमाणी या मार्गावर एकूण २८ बसेस सोडण्यात येतात. त्यानुसार या २८ बसेसच्या माध्यमातून नाशिकरोड ते त्र्यंबकेश्वर ११२ फेऱ्या तर त्र्यंबकेश्वर ते नाशिकरोड ११२ फेऱ्या अशा एकूण २२४ फेऱ्या नियमित चालविण्यात येतात. या नियमित फेऱ्यांव्यतिरिक्त रविवार दिनांक १० ऑगस्ट व सोमवार दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी प्रत्येक दिवशी २० जादा बसेस सोडण्यात येणार आहे. यामध्ये निमाणी ते त्र्यंबकेश्वर एकूण १० बसेस तर नाशिकरोड ते त्र्यंबकेश्वर एकूण १० बसेस जादा सोडण्यात येणार आहे. एकूणच रविवारी व सोमवारी प्रत्येक दिवशी नियमित २८ तसेच जादा २० अशा एकूण ४८ बसेस त्र्यंबकेश्वर करीता मार्गस्थ करण्यात येतील. व या ४८ बसेसच्या माध्यमातून सुमारे ३८४ फेऱ्या भाविकांच्या सेवेकरिता करण्यात येतील.

### केटीएचएम महाविद्यालयाच्या बोट क्लबला गंगापूजन संपन्न

**नाशिक ।** मविप्र समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयात नारळीपौर्णिमा व रक्षाबंधन निमित्त गंगापूजन करण्यात आले. यानिमित्त बोटक्लब



मधील बोटींचे देखील पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एस काळे, उपप्राचार्या डॉ कल्पना अहिरे, उपप्राचार्य डॉ व्ही बी बोरस्ते, बोट क्लब सेक्रेटरी व एनसीसी नेव्हल प्रमुख डॉ योगेश गांगुर्डे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक व बोट क्लब चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजपासून बोट क्लबच्या विविध उपक्रमांना सुरवात करण्यात आली असल्याचे प्राचार्य डॉ काळे यांनी सांगितले. याप्रसंगी प्राचार्य डॉ काळे यांच्या हस्ते गोदावरी नदी पात्रात श्रीफळ अर्पण करण्यात आले.

### सावानाची ग्रंथ पेटी योजना लवकरच होणार सुरू : जोशी

**नाशिक ।** सार्वजनिक वाचनालय, नाशिक नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असते. त्याचाच



एक भाग म्हणजे "सावाना ग्रंथ पेटी योजना" होय. वाचन संस्कृती वाढावी तसेच वाचनाचे संस्कार बाल वयातच म्हणजे शालेय जीवनापासूनच व्हावेत या करीता सावानाने वाचकांसाठी ग्रंथपेटी योजना आणली आहे. ही योजना प्रामुख्याने शाळा, हौसिंग सोसायटी, हॉस्पिटल, जेष्ठ नागरिक संघ यांच्यासाठी आहे, या योजनेत एका ग्रंथपेटीत २५ पुस्तके दिली जातील. या साठी रु. ३०००/- ही अनामत रक्कम असेल, यासाठी सावाना वेगळी फी आकारणार नाही. दोन ग्रंथपेट्यांसाठी रु ६०००/- अनामत रक्कम आकारण्यात येईल. या योजनेची एक नियमावली सावानाने बनविली आहे. या योजनेसाठी माधव गोपाळ कुलकर्णी यांच्या वयाच्या ८१ व्या वर्षानिमित्त त्यांनी रु.२१०००/- देणगी स्वरुपात दिले आहे. जे देणगीदार या योजनेसाठी देणगी देतील त्यांचे नाव ग्रंथपेटी किंवा ग्रंथ पिशवीवर छापण्यात येणार आहे. वाचन संस्कृती वाढावी म्हणून देणगीदारांनी सढळ हाताने या योजनेला आर्थिक मदत करून हातभार लावावा असे आवाहन सावाना कार्यकारीणीने केले आहे. योजना २२ ऑगस्ट पासून सुरु होणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क संजय रत्नपारखी- मो. ७९७२१६३५५७, दिलीप बोरसे– ८४५९४५६२३०, ग्रंथ सचिव देवदत्त जोशी– मो. ९८२२२१७९३५.

### ऑफिस ग्रुपतर्फे आज खिचडी वाटप

**नाशिक ।** आज तिसरा श्रावण सोमवार आहे. नाशिक शहरात अनेक ठिकाणी खिचडी आणि केळीचे वाटप करण्यात येते. अनेक मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी होते. अनेक ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. असाच एक खिचडी वाटपाचा कार्यक्रम पंचवटी कारंजा येथील ऑफिस गृपतर्फे आयोजित करण्यात आला आहे. आज सकाळी १०. ३० वाजता पंचवटी कारंजावरील ऑफिस गृपच्या समोर हा कार्यक्रम होणार आहे. या खिचडी वाटपाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रुपच्या सदस्यांनी केले आहे.

### दत्तु भडांगे यांचे निधन

**पेठ ।** तालुक्यातील झाडीपाडा येथील दत्तु



गोविंद भडांगे (६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुल एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते जनार्दन भडांगे यांचे ते वडील होत.

# ...असं रक्षाबंधन कोणाच्याच नशीबी नसावं

**गेल्या काही दिवसांपासून देशात आणि राज्यात माणसांपेक्षा जनावरांना आणि पक्षांना मोठी किंमत प्राप्त झाली आहे. माणसाच्या जगण्यापेक्षा त्यांचे जगणे सरकारने जास्तच मनावर घेतले आहे. त्यामुळेच आबालवृद्धांचे बळी गेले तरी सरकारला काहीच फरक पडत नाही. नाशिक जिल्हा त्याबाबतीत अत्यंत दुर्दैवी ठरत असून राज्यकर्ते अजूनही डोळ्यावर कातडी ओढून गाढ झोपी गेले आहे. जीवन जगण्यासाठी डोळे उघडून वाटचाल करणाऱ्या बालकांपासून तर मुलाबाळांचा संसार पाहणाऱ्या वृद्धांपर्यंत सगळ्यांचेच बळी जात आहे अन् जनता मात्र हतबल झाल्यासारखी दिसते. बिबटे असो, हत्ती असो अथवा कबूतर असो त्यांचे जगणे व त्यांची वाटचाल सुसह्य कशी होईल याचीच काळजी सरकारला पडली आहे. परंतु राखी पौर्णिमेच्या दिवशी एखाद्या चिमुकलीचा चिमुकला भाऊ जग सोडून जाताना त्याच्या हाताला बांधलेली राखी अनेकांच्या डोळ्यातून अश्रूला मोकळी वाट करून देते, तरी देखील सरकारच्या डोळ्यात अश्रू यायला तयार नाही. देवळाली कॅम्प परिसरात वडनेर दुमाला रेंजरोड येथे शुक्रवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घराच्या बाहेर खेळणाऱ्या तीन वर्षाचा चिमुरडा आयुष भगत याला बिबट्यानं उचलून नेत ठार केल्याची घटना घडली. राखी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी घडलेल्या या घटनेनंतर परिसरातील नागरिक भयभीत झाले. पण बिबट्याचा हल्ला व जनतेचे मरण थांबायला तयार नाही. मागील अनेक वर्षांपासून जिल्ह्यात बिबट्याची दहशत कायम आहे. ग्रामीण भागासह नाशिक शहरातही बिबट्या अनेकदा आढळून आलाय. त्यामुळं येथील नागरिक कायम भीतीच्या छायेखाली राहतात. वनखात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार नाशिक जिल्ह्यात मागील दीड वर्षात बिबट्याच्या हल्ल्यात नऊ जणांचा मृत्यू झालाय. वडनेर गेट रोडवरील मळे भागातील घटना अनेकांच्या काळजाला घर करून गेली. भगत परिवारातील आयुष आणि त्याची आठ वर्षाची बहीण श्रेया भगत घराच्या बाहेर खेळत होते. काही वेळाने श्रेया घरात आली. नंतर सर्वच जण परत आयुषला बघण्यासाठी बाहेर आले. मात्र, तो न दिसल्याने तो परिसरात असेल किंवा घरात झोपलेला असेल असं त्या कुटूंबाला वाटलं. शोध घेतल्यानंतर तो आढळला नाही. मात्र परिसरात रक्त सांडल्याचं आढळल्यानं त्याच्या कुटुंबीयांनी व आजूबाजूच्या रहिवाशांनी रक्ताच्या डागाच्या दिशेने शोधण्यास सुरुवात केली असता एका ठिकाणी त्याची रक्ताने माखलेली पॅन्ट दिसली. याबाबत वन विभागाला आणि पोलिसांना माहिती देण्यात आली. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी श्वान तसेच नाईट थर्मल ड्रोन घेऊन शोध सुरू केला. पोलिसांनी श्वानाच्या मदतीने वालदेवी नदीकिनारी शोध घेतला असता दोन तासांनी आयुष घरापासून चार किलोमीटर अंतरावर मृतावस्थेत आढळून आला. राज्यातील मुर्दाड व्यवस्थेचा तो बळी ठरला हे मात्र नक्की.**






असं रक्षाबंधन कोणाच्याच नशीब नसावं, जे भगत परिवारातील श्रेयावर आलं. बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेल्या भावाला अखेरची राखी बांधताना त्याची बहीण पाहून अनेकांच हृदय पिळवटून निघालं. भावाच्या कलेवराच्या हाताला राखी बांधणारा व ओवाळणारा क्षण विसरणे शक्यच नाही. रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी ठरली. ''आयुष'' आता या जगात नाही. फक्त तीन वर्षांचं कोवळं वय. घराबाहेर खेळत असताना बिबट्याच्या हल्ल्याने त्याचं आयुष्य हिरावलं. त्याच्या अंत्ययात्रेच्या आधी त्याची ९ वर्षांची बहीण मात्र राखी बांधताना दिसली. थंड पडलेल्या हातावर तिने हळुवारपणे राखी गुंफली. डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी ती त्याला ओवाळत होती. जणू सांगत होती "तू कुठेही असलास तरी, माझा भाऊच राहशील". राखीच्या धाग्यात प्रेम, ममता आणि आठवणी गुंफलेल्या आहेत. पण, यावेळी भावाकडून भेट नव्हती. होती ती फक्त एक कायमच्या विरहाची नकोशी वेदना. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रातून हळहळ व्यक्त होते आहे. भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला काळही हरवू शकत नाही. पण इथे नियतीनं मात्र क्रूरपणे नातं तोडून टाकलं. काळ कधी घाला घालेल सांगता येत नाही. घटना घडल्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने ड्रोनच्या मदतीने आयुषचा शोध सुरू केला होता. त्याच्या घरापासून पाचशे फुटांवर उसाच्या मळ्यात आयुष आणि बिबट्या असल्याचे संकेत ड्रोनने दिल्यानंतर शोध कार्यातील युवक, वनाधिकारी, पोलीस येथे पोहोचले. त्यावेळी अवघ्या दहा फुटावर बिबट्या असल्याचे ड्रोन चालकाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सर्वांना सावध केले. यावेळी वनविभागाचे अधिकारी आणि नागरिकांचा मोठा जमाव होता, तरीदेखील बिबट्या हाती लागला नाही. आयुषच्या मृत्यूची बातमी कानावर येते ना येते तोच बिबट्याच्या हल्ल्यात ६५ वर्षीय महिला ठार झाल्याची बातमी येताच नागरिकांमध्ये संताप व्यक्त झाला. दिंडोरी शहरातील बदादे वस्तीवर बिबट्याच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. जनाबाई बदादे (६५) असे बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. शेतात काम करत असताना त्यांच्यावर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यानंतर आजुबाजूच्या कामगारांनी तिला बिबट्याच्या जबड्यातून सोडवले. मात्र तिच्या मानेचा बिबट्याने लचका तोडल्याने ती जागीच ठार झाली. दिंडोरी शहरात बिबट्याच्या हल्ल्यात तिसरा बळी गेल्याने तीव्र संताप उसळला. मयत महिलेच्या नातेवाईकांनी वन विभागाच्या कार्यालयासमोर मृतदेह नेल्याने पोलीस आणि नातेवाईक यांच्यात संघर्ष सुरु झाला.

### बिबट्याच्या शोधार्थ गांवकरी झाले एकत्र

चिमुकल्या आयुषला बिबट्याने नेल्याची बातमी परिसरात पसरतात आख्ख गाव एकत्र झालं. कोणत्याही परिस्थितीत त्या बालकाला वाचवायचा निर्धार ग्रामस्थांनी केला होता. उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयंत शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे श्वान पथक, गुगल श्वान, स्थानिक लोकप्रतिनिधी, गावकरी युवक, आणि वनविभागाचे अधिकारी सक्रिय सहभागी होते. या शोध मोहिमेदरम्यान घराच्या मागच्या बाजूला असलेल्या दाराजवळ रक्ताचे डाग व थोड्या अंतरावर आयुषची पॅन्ट आढळून आली होती. त्यानंतर तातडीने व्यापक शोध मोहीम हाती घेण्यात आली होती. या शोध मोहिमेत गावकरी तसेच राजकीय नेत्यांसह वडनेर गेट, वडनेर गाव, कारगिल गेट, विहितगाव परिसरातील नागरिकांचा मोठा सहभाग होता. मात्र दुर्दैवाने आयुषचा मृतदेह हाती लागल्याने हळहळ व्यक्त करण्याशिवाय लोकांकडे पर्यायच राहीला नाही. परिसरात मोठ्या प्रमाणावर बिबटे असून रात्री बेरात्री घराच्या अवतीभवती फिरतांनाचे अनेक फुटेज समाज माध्यमांवर येत असतात. आता या बिबट्यांना संरक्षण देण्याच्या नादात मानवाचे संरक्षण हिरावले गेले आहे, याची जाणीव वन खात्याला किंवा सरकारला असायला हवी असा मतप्रवाह लोकांमध्ये दिसून येत होता. आयुषच्या हाताला राखी बांधून त्याला ओवाळताना त्याच्या बहिणीचे छायाचित्र समाज माध्यमातून घराघरात पोहोचले आणि प्रत्येकाच्या घरात अश्रूंच्या धारा वाहत होत्या. ऐन रक्षाबंधनाच्या दिवशी एका भावाने बहिणीला गिफ्ट देण्याचे आश्वासन दिले होते, पण नियतीने वेगळेच लिहून ठेवले होते नाशिक परिसरात या दुर्दैवी व मनाला चटका लावणाऱ्या घटनेची चर्चा होत आहे.

# मनपातर्फे निघाली पर्यावरणपूरक तिरंगा सायकल रॅली



**नाशिक ।** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त नाशिक महानगरपालिकेच्या वतीने "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत देशभक्ती आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणारी भव्य तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली.

या अभियानाद्वारे देशप्रेम, राष्ट्रीय एकता आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आला. महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, प्रदीप चौधरी, स्मिता झगडे, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, अजित निकत, नितीन पवार, नितीन नेर, शहर अभियंता संजय अग्रवाल, शिक्षण अधिकारी डॉ. मिता चौधरी यांच्यासह विविध अधिकारी आणि कर्मचारी या अभियानात सक्रिय सहभागी झाले आहेत. 2 ऑगस्टपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत नाशिक मनपातर्फे विविध उपक्रमांद्वारे नागरिकांमध्ये



देशभक्तीची भावना जागवली जात आहे. तिरंगा सायकल रॅलीचा शुभारंभ रविवारी (दि. १०) सकाळी राजीव गांधी भवन येथे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन बोधले आणि मनपा जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ झाला. नाशिक शहरातील पर्यावरणप्रेमी "सॅटर्डे-संडे ग्रुप"मधील सायकलिस्ट मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले. तिरंगा ध्वजांनी सजलेल्या सायकली आणि खांद्यावर तिरंगा घेऊन सर्व सायकलिस्टनी राजीव गांधी भवन- अनंत कान्हेरे मैदान- गडकरी चौक- अशोक स्तंभ- गंगापूर रोड- सोमेश्वर मार्गे परत राजीव गांधी भवन असा प्रवास केला. संपूर्ण मार्गावर "भारत माता की जय", "वंदे मातरम" अशा घोषणांनी शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

रॅलीदरम्यान "हर घर तिरंगा" प्रतिज्ञा घेण्यात आली. सर्व सायकलिस्टवर गुलाबपुष्पांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत करण्यात आले. देशभक्तीपर गीतांवर उत्स्फूर्त नृत्य आणि कविता सादरीकरणाने कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण प्राप्त झाले. किशोर माने, तृप्ती काटकर, ताजनपुरे, एस. पी. आहेर, लोहार, प्रशांत शिंदे, युवराज भोसले,सचिन सोनवणे यांच्यासह अनेक सायकलिस्टनी या रॅलीत सहभाग घेतला. हर घर तिरंगा राईडचे नियोजन करण्यात किशोर माने, बाबु दादा ताजनपुरे, एस. पी. आहेर, गोविंद शिंदे, किशोर पवार, सुदाम आथरे, गणेश लोहार, उल्हास कुलकर्णी, तृप्तीदा काटकर, मेघा सोनजे, अरुणा राणे, अपर्णा भोगिलकर, रोहिणी भामरे, मंदाकाकु येवले, मुक्ता मुळे, विनायक वारूंगसे, कैलाश भागवत, शिवाजी काकड यांनी परिश्रम घेतले.

**आज करणार मानवी साखळी**

"हर घर तिरंगा" अभियानांतर्गत आज (दि. ११) महापालिकेच्यावतीने राजीव गांधी भवन परिसरातून रेमंड सिग्नल ते तनिष्क गोल्ड शो रूमपर्यंत मानवी साखळीचे आयोजन सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे. या उपक्रमातूनही देशभक्ती आणि एकतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवला जाणार आहे.

# हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान यंदा गणेशोत्सवात साकारणार वामन अवतार

नाशिक । धार्मिक देखाव्यासाठी राणेनगर, राजीवनगर येथे प्रसिद्ध असलेल्या हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानने दरवर्षीप्रमाणे यंदाच्या गणेशोत्सवात वामन अवतारचा साकारणार भव्य देखावा साकारणार असल्याची माहिती प्रतिष्ठापनने दिली.

राणेनगर येथील हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान कला व क्रीडा मैदानावर ऐतिहासिक, पौराणिक हलते देखावे साकारले जातात. यंदा मंडळाच्या वतीने वामन अवतार हा महादेखावा साकारण्यात येणार आहे. 'वामन अवतार' भगवान विष्णूंच्या दशावतारांपैकी एक अवतार आहे.विष्णूंनी वामन अवतार घेतला आणि पृथ्वीवर (बटु) ब्राह्मण बालकाच्या रूपात जन्म घेतला. या अवतारात विष्णूंनी बळी नावाच्या दानवाचा पराभव केला आणि स्वर्गाचे रक्षण केले. वामन, बळीच्या यज्ञ शाळेत गेला आणि त्याने तीन पावले जमीन दान म्हणून मागितली. बळीने त्याला दान देण्याचे वचन दिले. वामनाने आपले रूप मोठे केले आणि एका पावलात पृथ्वी आणि दुसऱ्या पावलात स्वर्ग व्यापला. तिसरे पाऊल कोठे ठेवावे असे विचारले असता, बळीने



स्वतःचे मस्तक वामन चरणाखाली ठेवले, आणि विष्णूंनी त्याला पाताळ लोकात स्थान दिले.

या कथेनुसार वामन अवतारात विष्णूंनी बळीला पाताळ लोकात पाठवून देवांना स्वर्गात परत पाठवले.हा सर्व प्रसंग हलत्या देखाव्यातून साकारण्यात येणार आहे. भगवान विष्णूंची भव्य ४० फुट उंच मूर्ती प्रकट होते हे या देखाव्याचे मुख्य आकर्षण असणारआहे. गणेशोत्सवा दरम्यान मंडळाच्या वतीने दरवर्षी आनंद मेळ्याचे देखील आयोजन केले जाते. विशेष म्हणजे दर वर्षी पूजा देशमुख यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सव महिला उद्योजकता महोत्सव हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमाअंतर्गत परिसरातील गरजू, होतकरू महिलांना १० दिवस मोफत स्टॉल्स उपलब्ध करून दिले जाणार आहे. महिलांनी ७०५८९९८८७६ या क्रमांकावर संपर्क साधून स्टॉल बुकिंग करण्याचे आवाहन आयोजक पूजा देशमुख यांच्या वतीने करण्यात आले आहे. नाशिककरांनी या गणेशोत्सवाला भेट देऊन आपला आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन मंडळाचे संस्थापक सागर देशमुख यांनी केले आहे.

## आजचा वाढदिवस



सफल पारख

### नाशिक विभागाला मिळणार नियंत्रक? प्रमोद मेहुल आज पदभार घेण्याची शक्यता

**नाशिक ।** एसटी नाशिक विभागाचे नियंत्रक म्हणून प्रमोद मेहूल हे आज (दि. ११) सोमवारी पदभार स्वीकारण्याची शक्यता आहे. नाशिक विभागाचे नियंत्रक अरुण सिया यांची मार्च महिन्यात पुणे येथे बदली बदली झाल्यानंतर, त्यांच्या जागी पुण्यातीलच प्रमोद मेहुल यांची नाशिक येथे विभाग नियंत्रक पदावर बदली करण्यात आली. परंतु पाच महिन्याचा कालावधी उलटून अद्याप मेहुल यांनी पदभार स्वीकारलेला नाही. यामुळे महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी किरण भोसले यांच्याकडे अतिरिक्त कारभार देण्यात आला आहे. हे पद रिक्त असल्याने चालक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यामधून लिपिक पदांवरील सुमारे ८० हुन अधिक पदोन्नत्या रखडल्या आहे. यामुळे मेहुल यांनी त्वरित पदभार स्वीकारणे अपेक्षित होते, परंतु नाशिक येथे बदली झाल्याने मेहुल नाराज असल्याचे बोलले जात आहे. परंतु आता मेहुल हे आज पदभार स्वीकारणार अशी माहितीसमोर येत आहे.

### शिवसेनेचे आज महाराष्ट्र जनआक्रोश आंदोलन

**नाशिक ।** इव्हीएम आणि निवडणूक आयोगाच्या संशयास्पद कामकाजाविरोधात शिवसेना (उबाठा)च्या वतीने महाराष्ट्र जनआक्रोश आंदोलन केले जाणार आहे. सीबीएस येथील डॉ.बाबाबासाहेब आंबेडकर येथे हे आंदोलन सकाळी १२ वा. होणार असून यात मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित राहून निवडणूक आयोगाचा निषेध करणार आहे.

### भाजपा नाशिक महानगरतर्फे जागतिक आदिवासी दिन साजरा

**नाशिक।** भारतीय जनता पार्टी नाशिक महानगर तर्फे भाजपा वसंतस्मृती कार्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला असून स्वतंत्रता सेनानी इंग्रजांच्या विरोधात लढा देणारे नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी शहराध्यक्ष प्रशांत जाधव, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, रोहिणी नायडू, अनिता भामरे, महेश भामरे, वैशाली जोशी, अजीनाथ नागरगोजे, बापू डापसे, दयाराम पाटिल, रोहन जगताप, विजय कुलकर्णी, चव्हाण सर, हेमंत भावसार आदी उपस्थित होते.

# सर्व आरोपी निर्दोष, मग बॉम्बस्फोट घडवले कोणी ?

महाराष्ट्रनामा

सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

दि. २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव येथे झालेल्या बॉम्बस्फोटांत ७ जण ठार व १०० जखमी झाले. या प्रकरणात स्थानिक पोलीस, एटीएस आणि एनआयए अशा तीन तपास यंत्रणांनी आपले सर्वस्व पणाला लावले. सखोल तपास करून चौदा जणांना अटक केली. साध्वी प्रज्ञा सिंह, ले. कर्नल प्रसाद पुरोहितांवर गंभीर गुन्हे दाखल झाले. त्यांनीच बॉम्बस्फोट घडवले असे तपास यंत्रणांनी न्यायालयात आटापीटा करून सांगितले. प्रत्यक्षात सबळ पुराव्या अभावी या सर्वांची एनआयए विशेष न्यायालयाने ३१ जुलै २०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे मालेगाव बॉम्बस्फोट कोणी घडवले व सात जणांचा बळी कोणी घेतला या प्रश्नाचे उत्तर सतरा वर्षानंतरही मिळाले नाही.

मालेगाव येथे भिक्कू चौकात बॉम्बस्फोट झाले. त्यावेळी रमझानचा महिना चालू होता. घटनेनंतर पकडलेले आरोपी हिंदू होते. तेव्हा केंद्रात व राज्यात काँग्रेसचे सरकार होते. काँग्रेसच्या बड्या नेत्यांनी या घटनेचा उल्लेख करताना भगवा दहशतवाद असा शब्दप्रयोग वापरला होता. न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, भगवा दहशतवाद कधीच नव्हता व कधीही असणार नाही, अशी प्रतिक्रीया दिली.

भाजपाच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी यांच्यासह चौदा आरोपी या खटल्यात होते. हे सर्व आरोपी अभिनव भारत या हिंदुत्ववादी संघटनेशी व हिंदुत्ववादी विचाराशी निगडीत होते, असे एटीएसने दाखल केलेल्या आरोपपत्रात म्हटले होते. या आरोपींवर आयपीसी, मकोका, युएपीए अंतर्गत गुन्हे दाखल केले होते. एटीएस महाराष्ट्रातील प्रभावी तर एनआयए ही राष्ट्रीय पातळीवरील शक्तिशाली तपास यंत्रणा असूनही सर्व आरोपी सबळ पुराव्या अभावी निर्दोष सुटतात, याचा अर्थ काय असू शकतो ? दि. ११ जुलै २००६ रोजी मुंबई उपनगरीय रेल्वेत सात धावत्या लोकल्समधे सात ठिकाणी बॉम्बस्फोट झाले व त्यात १८९ निरापराधी प्रवासी ठार झाले व ८२४ जखमी झाले होते. लोकल्स ट्रेन बॉम्ब स्फोटाचा बदला घेण्यासाठी मालेगावात बॉम्बस्फोट घडवले असे तर्क मांडले गेले . मुंबई लोकल ट्रेन बॉम्बस्फोट व मालेगाव बॉम्बस्फोटात विश्वास ठेवावा असे भक्कम पुरावे कोर्टापुढे आले नसतील तर त्याला जबाबदार कोण ? केवळ संशयावरून दोषी ठरवता येणार नाही, असे कोर्टाने निकालपत्रात म्हटले आहे. मग खरे गुन्हेगार कुठे आहेत ? त्यांना कधी पकडणार ? पिडितांना न्याय कधी मिळणार ? ट्रेन बॉम्बस्फोटाची घटना २००६ मधे घडली. विशेष सत्र न्यायालयाने पाच जणांनी फाशीची तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. एका आरोपीची निर्दोष सुटका झाली तर एकाचा जेलमधेच मृत्यु झाला. मुंबई उच्च न्यायालयाने २१ जुलै २०२५ रोजी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यावर सरकारने जनक्षोभ लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली व उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती मिळाली. मात्र बाहेर आलेले आरोपी पुन्हा जेलमधे जाण्याची गरज नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ट्रेन बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर १९ वर्षानंतरही खरे गुन्हेगार कोण हे सांगता येत नाहीत यापेक्षा दुर्दैव काय असू शकते ?

मालेगाव बॉम्बस्फोटात मिळालेल्या बाईकमधे स्फोटके होती हे कोर्टासमोर सिध्द करण्यास तपास यंत्रणंना अपयश आले. तपास यंत्रणांनी बॉम्बस्फोटात १०१ लोक जखमी झाल्याचे म्हटले होते, प्रत्यक्षात ९५ आहेत असे कोर्टाला आढळून आले. वैद्यकीय प्रमाणपत्रे जी सादर करण्यात आली, त्यात फेरफार करण्यात आलेले आहेत असे कोर्टाने नमूद केले आहे. स्फोटात वापरण्यात आलेल्या बाईकचा चासिस नंबर तपासात कधीच सापडला नाही, तसेच ती बाईक साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्या मालकीची आहे हे सिध्द करता आले नाही. रमझानच्या महिन्यात मालेगावात मोठा पोलीस बंदोवस्त असताना संशयित बाईक घटनास्थळी आलीच कशी ? याचे उत्तर पोलिसांना देता आले नाही. कर्नल प्रसाद पुरोहित यांनी आरडीएक्स आणले हे तपास यंत्रणांना सिध्द करता आले नाही. अभिनव भारत या संघटनेने दहशतवादी कारवायांसाठी आरोपींना पैसा पुरवला हेही पोलिसांना कोर्टासमोर सिध्द करता आले नाही. आरोपींवरील गुन्हे सिध्द करण्यासाठी ठोस पुरावे नाहीत असे कोर्टाने निकालपत्रात म्हटले आहे.

मालेगावात बॉम्बस्फोट घडविण्यापूर्वी आरोपींच्या ठिकठिकाणी बैठका झाल्या असे आरोपपत्रात म्हटले आहे. पण त्याचे ठोस पुरावे देता आले नाहीत. आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली होती, नंतर मकोका मागे घेण्यात आला, त्यामुळे मकोका अंतर्गत त्यांचे घेतलेले जाबजबाबही रद्द झाले. आरोपींवर युएपीए अंतर्गत कारवाई चुकीची होती हेही नंतर स्पष्ट झाले. तपास यंत्रणांनी कोर्टासमोर जे फोन कॉल्सचे रेकॉर्ड सादर केले, ते तपासण्यासाठी गृह विभागाच्या सचिवांची मंजुरी घेतली नव्हती. स्फोटात आरडीएक्स वापरले पण त्याचा स्त्रोत तपास यंत्रणांना सिध्द करता आला नाही. स्फोटके कर्नल पुरोहितांनी काश्मीरमधून आणली हे कोर्टापुढे सिध्द करता आले नाही. कोणत्या आरोपीच्या घरी बॉम्ब तयार करण्यात आले हे याचा पुरावा देता आला नाही. एटीएस व एनआयआय या दोन्ही तपास यंत्रणांच्या अहवालात विसंगती दिसून आली. मुळात एकाच घटनेचा तपास दोन- दोन यंत्रणांकडे एकाच वेळी का देण्यात आला, हे समजले नाही. एवढ्या गंभीर त्रूटी किंवा चुका किंवा परस्पर विरोधी निदाने एटीएस आणि एनआयए यांनी केलेल्या तपासात कशा असू शकतात ? एटीएस व एनआयए यांनी सादर केलेल्या आरोपपत्रांमधे काही मुद्द्यावर तफावत असल्याचेही कोर्टाच्या निदर्शनाला आले.

नांदेड येथे पाटबंधारे वसाहतीत दि. ६ एप्रिल २००६ रोजी झालेल्या बॉम्बस्फोटात २ ठार व ४ जखमी झाले होते. तपास एटीएस व सीबीआयने केला. आरोपींचा पूर्णा, परभणी व जालना येथील बॉम्बस्फोटाशी संबंध असल्याचा तपासानंतर दावा करण्यात आला. आरोपी हिंदुत्ववादी संघटनांशी निगडीत असल्याचे सांगण्यात आसे. दोन हजार पानी आरोपपत्र दाखल केले. नांदेड न्यायालयाने ४ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निकालात सर्व बारा आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

मुंबई लोकल ट्रेन, मालेगाव, नांदेड या तिनही घटनांमधे बॉम्बस्फोटाचा तपास एटीएसने केला व तिनही प्रकरणात आरोपी निर्दोष सुटले , हे काही महाराष्ट्र पोलिसांना भूषणावह नव्हे.

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात एटीएसने सादर केलेले पुरावे एकमेकांशी जुळत नव्हते किंवा परस्परविरोधीही आढळले. एनआयएच्या विशेष न्यायालयात सर्वच आरोपींनी मकोका अंतर्गत कारवाईला आव्हान दिले. साध्वी प्रज्ञासिंह यांनी मालेगाव प्रकरणात आपला जेलमधे पोलसांनी क्रूरपणे छळ केला असे म्हटले आहे. त्यांनी बड्या पोलीस अधिकाऱ्यांची नावेही घेतली आहेत. तसेच एका तपास अधिकाऱ्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना अटक करण्यासाठी आपल्यावर दबाव आणला होता असेही म्हटले आहे. विशेष म्हणजे मालेगाव प्रकणातील २०१६ मधे गायब झालेले महत्वाचे १३ दस्तऐवज शेवटपर्यंत सापडलेच नाहीत.

# …हा तर 'साप म्हणत भूई थोपटण्याचा' प्रकार!

गुरुवार (दि.७) रोजी काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते (?) राहुल गांधी यांनी दिल्लीत एक प्रेझेंटेशन सादर केले. या प्रेझेंटेशन सोहळ्याला(?) अनेक विरोधी पक्षांचे नेते हजर होते. सदरच्या प्रेझेंटेशनमध्ये राहुलबाबा ऊर्फ सीनियर पप्पूने जुनेच रडगाणे गात, मतचोरीबाबत आरोप केले. या आरोपांवरून राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे.

राहुल गांधी यांनी 'पुराव्या'सह प्रेझेंटेशन सादर करत थेट निवडणूक आयोगावर आरोप केले. त्यानंतर महाराष्ट्र, बिहारसह अनेक राज्यांतील निवडणूक अधिका-यांनी राहुल गांधी यांना पत्र लिहून नियमानुसार ' दावा खरा असेल तर सहीसह प्रतिज्ञापत्र सादर करा' असे आव्हान त्यांना दिले आहे. प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर त्याचा अभ्यास केला जाईल; आणि गरज पडल्यास चौकशीही करता येईल, असेही निवडणूक आयोगाने म्हटले आहे. राहुल यांना, मतचोरीबाबतचे त्यांचे दावे सत्य वाटत असतील तर त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर करावे. यात त्यांना काहीच अडचण नसावी. मतदार यादीत चुकीच्या पद्धतीने समाविष्ट केलेली किंवा काढून टाकलेल्या मतदारांची नावेही त्यांनी सादर करावीत. राहुल गांधी प्रतिज्ञापत्र सादर करणार नसतील तर, त्यांचा त्यांच्या दाव्यावर विश्वास नाही, हे स्पष्ट होईल आणि त्यांचे आरोप आधारहीन असल्याचा निष्कर्ष निघेल, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

परदेशात आपल्या देशाविरुध्द 'बेताल' वक्तव्य करणा-या राहुलबाबाने नेहमीप्रमाणेच तथ्यहीन बडबड केली. तुम्ही निवडणूक आयोगावर अक्षरशः गंभीर आणि न पटणारे आरोप केले आहेत. त्याला निवडणूक आयोग आव्हान देणार, हे क्रमप्राप्त आहे. पण, तुम्ही सरळसरळ खोटे बोलत आहात, हे तुम्ही घेतलेल्या पळकुट्या भूमिकेवरून स्पष्ट झाले आहे. तुमचे आरोप खरे असते आणि तुमच्याकडे पुरावे असते तर 'कर नाही त्याला डर कशाला'? या युक्तीनुसार सहीसह प्रतिज्ञापत्र सादर केले असते. पण, तुम्ही शेपूट घालत 'संसदेत शपथ घेतली आहे' असे थातुरमातुर उत्तर देऊन जबाबदारी झटकून मोकळे झाले. यावरून 'आडातच नाही तर पोह-यात कुठून येणार'? हे स्पष्ट झाले.

राहुलबाबाच्या या 'अर्थहीन' प्रेझेंटेशनला हजर असलेल्या बारामतीच्या दगाबाज 'करामती' काकाला एकदम जाग आली. मग त्यांनीही विधानसभा निवडणुकी दरम्यान माझ्याकडे २ माणसे आली होती. त्यांनी १६० जागा जिंकून देतो, अशी ऑफर दिली होती, असे विधान केले. मी त्यांना राहुलकडे घेऊन गेलो. पण, आमच्या बुद्धीला ते पटले नाही, म्हणून आम्ही त्या 'डील'ला नकार दिला, अशी 'मल्लीनाथी' जोडली. वृत्तवाहिन्यांच्या म्हणण्यानुसार हे 'खळबळजनक' वृत्त असेल. पण, शेंबड्या पोरालाही समजले की, जे बोलणार ते करणार नाही. पण, जे करतात ते कधीही बोलत नसणा-या काकांनी अक्षरशः खोटे बोलत, जनतेत संभ्रम निर्माण व्हावा म्हणून हे पिल्लू सोडले आहे. काकांच्या या 'तथ्यहीन' दाव्यावर अनेक प्रश्न उपस्थित होतात.

तुम्हाला आजच का जाग आली? इतक्या दिवस तुम्ही 'कोमात' होता का? 'भावी पंतप्रधान', 'जाणता राजा', 'चाणक्य' अशी तुमची राजकारणात ख्याती आहे. याचा अर्थ असा की, तुम्ही या देशाचे खुप जबाबदार नागरिक आहात. जबाबदार व्यक्ती म्हणून 'लोकशाही' अबाधित राहण्यासाठी तुम्ही निवडणूक आयोग किंवा पोलिसांत तक्रार दाखल का केली नाही? राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या निवासस्थानी अथवा कार्यालयात येणा-या-जाणा-या प्रत्येक व्यक्तीची नोंद असणारच. मग तुम्ही त्या व्यक्तींची नावे आता आठवत नाहीत, असे सपशेल खोटे का बोलता? सगळ्यात महत्त्वाचे आणि हास्यास्पद म्हणजे, 'पाठीत खंजीर खुपसणे' असे ऐकताना, वाचताना ज्या माणसाचा चेहरा डोळ्या समोर येतो. सत्तेत राहण्यासाठी किंवा तिच्या आसपास राहण्यासाठी जो 'धूर्त' माणूस जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून 'मविआ'सारख्या 'अभद्र' युतीला जन्म देतो, असा माणूस अशी 'सुवर्णसंधी' सोडेल, ये कुछ हजम नही होता.

सलिमने कथेचा अर्धा भाग सांगितला. मग, जावेद कसा मागे राहील. 'फेक नॅरेटिव्हचा बादशहा' आणि 'एक नंबरचा थापाड्या' अशी राजकारणात ख्याती असणा-या आणि काकांच्या घरची भांडी घासण्याची सवय लागलेल्या 'भांडूपच्या देवानंद'ला एकदम साक्षात्कार झाला. त्यानेही काकांची री ओढत, उध्दव ठाकरे आणि मलाही त्यावेळेस काही लोक भेटले होते; आणि त्यांनी ६०/६५ जागा जिंकून देतो, अशी ऑफर दिली होती. परंतु, आमचा 'लोकशाही'वर विश्वास आहे, असे सांगून नकार दिला, अशी मुक्ताफळे उधळली. एकवेळ दुस-या कोणी नेत्याने असा आरोप केला असता तर, एकवेळ पटले असते. पण, भाजप आणि त्यांच्या नेत्यांच्या द्वेषाची काविळ झालेल्या आणि रोज विषारी फुत्कार टाकणा-या या माणसाचे हे तथ्यहीन आरोप म्हणजे, 'राहुलबाबाची पालखी वाहण्या'चा केलेला केविलवाणा आणि लाचार प्रयत्न आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये, असो.

निवडणूक आयोगाने एकदा, दोनदा नव्हे तर, चार वेळा 'ईव्हीएम मशिन हॅक करून दाखवा' असे आव्हान दिले होते. पण, एकही पक्ष अथवा तंत्रज्ञ पुढे का आला नाही? या प्रश्नातच सर्व काही स्पष्ट होते. लोकसभेत 'फेक नॅरेटिव्ह'मुळे यश मिळाले. ते यश डोक्यात गेले. अहंकार वाढला, शेवटपर्यंत जागा वाटपाचा घोळ कायम होता. त्यामुळे 'मविआ'चा दारुण पराभव झाला. हे उध्दव ठाकरे यांनी 'हास्यजत्रा'च्या 'महाएपिसोड'मध्ये कबूल केले आहे. महत्त्वाचे म्हणजे 'राजकारण' आणि 'खेळ' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाचा 'विजय' आणि दुस-याचा 'पराभव' ठरलेला आहे. खिलाडीवृत्तीने जो पराभव स्वीकारतो, तोच खरा खिलाडी असतो. पण, आजच्या 'गलिच्छ' राजकारणात 'सूड' आणि 'द्वेषा'ने बरबरटलेल्या नालायक कारभा-यांचा भरणा अधिक असल्याने असेच 'सडके' राजकारण आपणास बघायला मिळेल, यात तिळमात्र शंका नाही.

खरे तर लोकशाही अबाधित ठेवण्याचे या नेत्यांचे आद्यकर्तव्य आहे. पण, स्वतःच्या स्वार्थासाठी आणि 'बिनपाण्याशिवाय तडफडणा-या माशासारखी' गत झालेले हे कारभारी सत्ता हस्तगत करण्यासाठी 'साप साप म्हणत भूई थोपटण्या'चा दयनीय आणि केविलवाणा प्रयत्न करत आहेत, हे सूज्ञ मतदार चांगलेच जाणून आहेत.

प्रदीप व्ही. खोलमकर,
नाशिक.
मोबाईल- ८७६७५०२९८०.

# 'ॐ नम: शिवाय' कपड्यांवर नको !



श्रावण मास सुरु असल्याने सर्वत्रचे वातावरण भक्तिमय झाले आहे. श्रावण मासात शिवभक्त भगवान शिवाची विशेष भक्ती करतात. काही जण प्रत्येक सोमवार निर्जली उपवास करतात तर काही जण श्रावण मास पादत्राणे परिधान करत नाहीत, या मासातील प्रत्येक सोमवारी शिवमंदिरात शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. याच दिवसांत ॐ नम: शिवाय। हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय। हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नम: शिवाय हा मंत्रजप श्रावणात अधिकाधिक करायला हवा. ज्यामुळे भगवान शिवांची अखंड कृपा आपल्यावर राहिल.


जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# लोककल्याणकारी अहिल्याबाई होळकर



भारतात अनेक स्त्रीरत्नांनी जन्म घेतला. आपली कीर्ती जगभर पसरवली. पुराणातल्या स्त्रिया सोडल्या तर राजघराण्यातील अनेक स्त्रिया काही मुल्ये उराशी धरून न्यायासाठी, कर्तव्यासाठी हातात समशेरी घेऊन राजकारणात सहभागी झाल्या. त्यात राजमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, गौंड वीरांगना राणी दुर्गावती, सातवाहन देवी गौतमी अशी अनेक स्त्री रत्ने होऊन गेली. पण यासर्वांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे स्थान आगळेच.

अहिल्याबाई म्हटले की आपल्या डोळ्यासमोर केवळ मंदिरे बांधणारी, दान दक्षिणा देणारी, पुजापाठ करणारी धार्मिक स्त्री अशीच प्रतिमा उभी राहते. त्यामुळे त्यांनी केलेले पुरोगामी कार्य नेहमीच उपेक्षित राहीले. अहिल्याबाई होळकरांनी अनेक लोककल्याणकारी कामे केली. त्यांनी अनेक मंदिरांचे जिर्णोद्धार केलेत. पण सोबतच त्यांनी तलाव बांधले, धर्मशाळा बांधल्या, अनेक घाट बांधले. अस्पृश्यता उच्चाटन, सर्वधर्म समभाव, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट रूढी परंपरा चालीरितींचा बिमोड असे केलेले पुरोगामी कार्य मात्र उपेक्षित राहिले. लोकमाता अहिल्याबाई होळकर ह्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची, महापराक्रमी, लोककल्याणकारी विचारांची स्त्री होती. त्या मुत्सद्दी व बुद्धिमान होत्या.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्हयातील चोंडी या छोटयाशा खेडयात धनगर जातीत माणकोजी शिंदे व सुशिलादेवी या दांपत्याच्या पोटी झाला. त्याकाळात स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले. पुढे माळवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव होळकर पुण्याला जात असतांना चौंडी गावी मुक्कामी होते. तेथे त्यांनी मंदिरात अहिल्याबाईंना पाहिले. तिच्या हजरजबाबी व चुणचुणीत स्वभावाला पाहून मल्हाररावांनी आपल्या मुलाच्या विवाहासाठी आपल्याच जातीतील शिंदे कुटुंबाकडे विचारणा केली. पुढे मल्हारराव यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह वयाच्या आठव्या वर्षीच २० मे १७३३ रोजी झाला. आपला पुत्र खंडेराव व्यसनाधीन असून राज्यकारभार समर्थपणे सांभाळू शकणार नाही हे ध्यानी आल्यावर मल्हाररावांनी अहिल्याबाईंना राजकारणाचे चौफेर शिक्षण दिले. अहिल्याबाईंनी मल्हाररावांकडून घोडयावर बसणे, तलवार चालविणे, दांडपट्टा खेळणे याचे प्रशिक्षण घेतले. पुढे अहिल्याबाईंना मालेराव व मुक्ता अशी दोन अपत्ये झाली. इ.स. १७५४ मध्ये जाटांबरोबर कुंभेरीच्या लढाईत पती खंडेराव यांचा मृत्यु झाला. खंडेरावांचा मृत्यू हा अहिल्याबाईंवरच नाही तर मल्हारराव आणि त्यांच्या पत्नी गौतमाबाईंवर सुद्धा मोठा आघात होता. त्याकाळी सती जाण्याची अनिष्ठ प्रथा अस्तित्वात होती. अहिल्याबाईही सती जायला तयार झाल्या. पण सासरे सुभेदार मल्हारराव होळकरांनी त्यांना सती जाऊ दिलं नाही. संपुर्ण भारतभर दरारा निर्माण करणा-या मल्हाररावांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्याबाई न्यायनीती, युद्धकौशल्य, प्रशासन आदी बाबतीत परिपक्व होत होत्या. इ.स. १७६६ मध्ये सुभेदार मल्हारराव होळकर मरण पावल्यानंतर राज्याची धुरा अहिल्याबाईंनी आपल्या खांदयावर घेतली. व २८ वर्ष ती समर्थपणे चालवली. अनेक परीने राज्य संपन्न केले.

अहिल्याबाई लोककल्याणकारी कामे करत राहीली. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. लोकमाता अहिल्यादेवींनी आपले संपुर्ण आयुष्य या कार्यासाठी वेचले. कामे करतांना त्यांनी प्रदेशाची मर्यादा न घालता संपुर्ण भारतात कार्य केले आहे. अनेक ठिकाणी त्यांनी विहीरी, तलाव, कुंड, व घाट बांधले. रस्ते व पुल निर्माण केले. लोककल्याणाची कामे त्या खाजगी तिजोरीतून करत. अहिल्याबाईंनी खासगी आणि सरकारी तिजोरीचे हिशेब वेगळे ठेवले होते. त्यांनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः आयोजित करून रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवींनी संगीत, कला व उद्योग यांना कायम आश्रय दिला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला.

अहिल्याबाई होळकर न्यायप्रिय होत्या. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजीबाबा होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. यावरून सर्वांसाठी सारखा न्याय त्यांनी ठेवल्याचे दिसते. राज्यात धुमाकुळ घालणा-या दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी अहिल्याबाईंनी आपली मुलगी पणाला लावली. जो कुणी दरोडेखोरांचा बंदोबस्त करील त्याचा विवाह मुक्ताबाईशी करून दिला जाईल असे त्यांनी भर दरबारात जाहीर केले. तेव्हा यशवंतराव फणसे या वीराने दरोडेखोरांचा यशस्वीपणे नायनाट करून पण जिंकला. तेव्हा अहिल्याबाईंनी त्याची जात, धर्म, घराणे काहीही न बघता त्याच्याशी आपल्या मुलीचा विवाह लावून दिला.

राघोबा पेशवा व गंगाधरपंत चंद्रचुड हे निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेत होळकरांच्या राज्यावर आपल्या सैन्यानीशी चालून आले. तेव्हा अहिल्यादेवींनी न डगमगता पेशव्यांना संदेश पाठविला की, आता आपली गाठ रणांगणात पडेल. मी हरले तरी किर्ती करून जाईल. पण आपण स्त्रीकडून हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. या राज्यावर ज्यांनी हुकुमत गाजवली त्यापैकी एकाची सुन, एकाची पत्नी, आणि एकाची मी आई आहे हे ध्यानात असु दया. मी अबला असे समजु नका. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही अशा कडकडीत संदेशाने राघोबांचे अवसान पार गळाले. कुटील ईच्छा मनातच विरघळून गेली. व खालच्या मानेने आपल्या वाटेने परत गेले.


अहिल्यादेवी होळकर यांनी पती खंडेराव, सासरे मल्हारराव होळकर, पुत्र मालेराव, जावई यशवंतराव फणसे यांचा मृत्यू डोळ्याने बघितला. मुलगी मुक्ता जावायासोबत सती गेली. सर्व आप्तेष्टांची श्रृंखला काळाने एकामागोमाग एक हिरावून नेल्यानंतरही त्या खचल्या नाही. आपल्या रयतेवर पुत्रवत प्रेम करत राहील्या. अशी उत्तुंग व्यक्तिमत्वाची प्रकाशमय ज्योती, कुशल प्रशासक महापराक्रमी लोकमाता वयाच्या सत्तराव्या वर्षी १३ ऑगस्ट १७९५ या दिवशी अंतर्धान पावली. १३ ऑगस्ट स्मृतिदिनानिमित्त या लोकमातेस विनम्र अभिवादन.

नितीन गो. धोरण
अकोट जि. अकोला. मो. नं. ९८५०३४३९८८

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई



भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे (रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३० डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!


श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# राष्ट्रध्वजाचा सन्मान : प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य!

वाचक लिहितात

राष्ट्रध्वज हा आपल्या देशाच्या अस्मितेचे, अभिमानाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. १५ ऑगस्ट (स्वातंत्र्यदिन) या दिवशी संपूर्ण देशभरात अत्यंत गौरवाने आणि अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवला जातो. शूर स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानाचे स्मरण केले जाते. मात्र ,दुर्दैवाची बाब अशी की, अनेक वेळा या दिवशीच राष्ट्रध्वजाचा अपमान होताना दिसतो. बाजारात सहज मिळणारे प्लास्टिकचे छोटे झेंडे रस्त्याच्या कडेला, कचऱ्यात किंवा पायाखाली चिरडलेले आढळून येतात. काही वेळा नृत्य, नाटक किंवा इतर कार्यक्रमांमध्ये राष्ट्रध्वजाचा अयोग्य वापर होतो. केकवर राष्ट्रध्वजाचे चित्र कापणे, चेहऱ्यावर राष्ट्रध्वजाचे चित्र रंगवणे, हा देखील त्याचा अपमान आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिकांनी, क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाचा देखील अपमान आहे.

राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. रस्त्यावर राष्ट्रध्वज पडलेला दिसल्यास तो सन्मानपूर्वक उचलून योग्य ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांना या संदर्भात प्रबोधन करणे हे आपले कर्तव्य आहे. तसेच सीमेवर तैनात असलेले सैनिक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशाचे रक्षण करतात. त्यांच्या त्यागामुळे आपण सुरक्षित आहोत, याचे भान प्रत्येक भारतीयाने ठेवले पाहिजे.

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राचा आत्मा! त्याचा सन्मान राखणे, त्याचा अपमान टाळणे आणि इतरांनाही याची जाणीव करून देणे हीच खरी देशभक्ती आहे.

सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा

## इंटरनेटवर तरुणीचे फोटो मॉर्फ केले गुंड लॉरेन्स बिश्नोई याच्या नावाने आयडी बनवून धमकावण्याचा प्रयत्न

**अंबरनाथ, दि. १० : प्रतिनिधी**

अंबरनाथ पूर्व येथे राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणीचे फोटो मॉर्फ करून अश्लील व्हिडीओ इंटरनेटवर अपलोड केल्याप्रकरणी अज्ञात इसमाच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या आरोपीने पीडित तरुणीला वारंवार फ्रेंड रिक्वेस्ट पाठवल्या असुन कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोई याच्या नावाने आयडी बनवून तिला धमकाविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अंबरनाथ पूर्व येथे आपल्या कुटुंबासह राहणारी २५ वर्षीय तरुणी एका खाजगी कंपनीत काम करते. ८ फेब्रुवारी २०२५ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सदर आरोपीने Lawrence_bishnoi_70, akshay22117734, या आयडीवरून त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवरून दोन वेगवेगळया मोबाईल नंबरवरून पीडित तरुणीला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवल्या व मेसेज पाठविले होते. पीडित तरुणीने त्याला प्रतिसाद न दिल्याने आरोपींनी पीडितेच्या परवानगीशिवाय तिचे फोटो घेतले आणि ते मॉर्फ करून त्याचे अश्लील व्हिडिओ तयार करून इंटरनेटवर अपलोड केले.

याप्रकरणी पीडित तरुणीने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार केली असता पोलिसांनी अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा मोबाईल नंबर आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे या गुन्ह्याचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक के पी हासगुळे हे करीत आहेत.

## मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते अंबरनाथ येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय व नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन संपन्न

**अंबरनाथ, दि. १० : प्रतिनिधी**

अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील ही न्यायालयाची वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी आज येथे केले. अंबरनाथ येथील चिखलोली येथे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या तसेच नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

न्यायमूर्ती श्री.कुलकर्णी पुढे म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येमुळे अंबरनाथसारख्या ठिकाणी हे न्यायालय झाल्यामुळे न्यायदानाचे काम जलदगतीने होणार आहे. अंबरनाथ येथील ही न्यायालयीन इमारत आधुनिक असून येथे विविध आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. याकरिता इमारतीच्या बांधकामात समाविष्ट असलेल्या सर्व यंत्रणांचे आभार. या आधुनिक इमारतीच्या माध्यमातून "न्याय आपल्या दारी" ही संकल्पना साकार होण्यास मदत होणार आहे. लोकांचा न्याय व्यवस्थेवर प्रचंड विश्वास आहे. लोक न्यायालयात आपल्या समस्या घेऊन येतात. न्यायालयात येणाऱ्या नागरिकांचे काम लवकरात लवकर मार्गी लागले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील ही वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल अशी मला अपेक्षा आहे. या उद्घाटनाच्या निमित्ताने आपण न्यायालयाकडे केवळ कायद्याच्याअंमलबजावणीसाठी नव्हे तर जनतेच्या विश्वासास पात्र ठरणारी एक सजीव संस्था म्हणून पाहू या.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज उद्घाटन झालेल्या या न्यायालयाची इमारत अतिशय सुंदर व प्रशस्त झाली आहे. अंबरनाथची ओळख असलेल्या पुरातन शिवमंदिराप्रमाणे हे न्यायमंदिर देखील एक ओळख होईल. या न्याय मंदिरात कायम सत्याचाच विजय होईल. राज्याला निष्पक्ष न्यायदानाची परंपरा आहे. आम्ही विविध उद्घाटने करतो मात्र न्यायालयाचे उद्घाटन करणे ही एक आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. ते पुढे म्हणाले की, आपले शासन लोकांना न्याय देणारे आहे. मागील अडीच वर्षात ३२ न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. न्याय संस्था सुदृढ करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सामान्य नागरिकांना



चांगल्या वातावरणात न्याय मिळेल. त्याचप्रमाणे न्यायव्यवस्थेच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे काम शासन करेल, जेणेकरून नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होईल. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे, न्यायमूर्ती अद्वैत सेठना, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे श्रीनिवास अग्रवाल, तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष ॲड.विठ्ठल कोंडे-देशमुख, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.गजानन चव्हाण, उल्हासनगर तालुका बार ॲडव्होकेट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संजय सोनवणे, आमदार डॉ . बालाजी किणीकर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, कार्यकारी अभियंता सत्यनारायण कांबळे, उल्हासनगरचे उपविभागीय अभियंता प्रशांतकुमार मानकर, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता मानसिंग शिंदे, तहसिलदार अमित पुरी, उप अभियंता हेमंत वाघमारे, अंबरनाथ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, शाखा अभियंता प्रशांत घुगे, जिल्ह्यातील वकील, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, नागरीक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ विधीज्ञांचा सत्कार तसेच उल्हासनगर बार असोसिएशनच्या वतीने प्रकाशित स्मरणिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते संविधान उद्देशिका प्रतिमा पूजनाने करण्यात आली असुन कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली आहे . कार्यक्रमाचे प्रास्ताविक उल्हासनगर तालुका बार ॲडव्होकेट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड.संजय सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखलोली-अंबरनाथ अर्चना जगताप यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड.वैशाली पाटील व ॲड.नरेंद्र सोनजी यांनी केले.

## पत्रकार जितेंद्र टोके यांचा सन्मान

**डहाणू, दि. १० : प्रतिनिधी**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त डहाणूत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या आदिवासी समाजातील व्यक्तींना सन्मान करण्यात आला. .याकार्यक्रमात दैनिक महासागरचे डहाणू तालुका प्रतिनिधी जितेंद्र टोके यांचा



पत्रकारितेत उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल आमदार विनोद निकोले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## नाष्टा सेंटरमध्ये गुंडांकडून वेटरला मारहाण व चाकू हल्ल्याचा प्रयत्न

**उल्हासनगर, दि. १० : प्रतिनिधी**

उल्हासनगर येथील सी एच एम महाविद्यालयाजवळ असलेल्या राम नाष्टा या हॉटेलमध्ये एका ग्राहकाने वेटरला मारहाण करून चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी आरोपी मॉन्टी बहादूर करोतिया आणि त्याच्या एका साथीदारावर गुन्हा दाखल केला आहे. परवा दुपारी १.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली असुन तक्रारदार सुरजीत उर्फ अमरजीत मोतीराम यादव, वय २०, हे राम नाष्टा हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करतात.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मॉन्टी करोतिया आणि त्याचा साथीदार हॉटेलमध्ये भजी घेण्यासाठी आले होते. यादव यांनी त्यांना कांदा देण्यास उशीर केल्याने करोतिया संतापला व त्याने यादव यांच्या छातीला पकडून त्यांच्या कानशिलात मारली.

यावेळी हॉटेलचे मालक आणि कुडलीक मोरे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. यानंतर, मॉन्टी करोतिया हॉटेलमधून बाहेर गेला आणि चाकूसारखे धारदार शस्त्र घेऊन परत आला. त्याने हवेत चाकू फिरवत यादव यांना मारण्याचा प्रयत्न केला. त्याने आजूबाजूच्या लोकांना आणि यादव यांच्यासोबत असलेल्या लोकांना धमकावले, "कोई बीच मे नही आयेगा, आया तो काट डालुगां." या घटनेमुळे घाबरून अनेक दुकानदारांनी आपली दुकाने बंद केली.

या घटनेनंतर आरोपींनी यादव यांना पुन्हा धमकावले व निघून गेले. यादव यांनी याबाबत मध्यवर्ती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी कलम ११५(२), ३५१(२), ३५२ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१), १३५ सह फौजदारी कायदा कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर वाघमारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# कार्यालय गावात, तलाठी शहरात

### ⏭ सांगा साहेब तुम्हाला शोधायचे कुठे?
### ⏭ गावकऱ्यांचा तलाठ्यांना सवाल

**वाडा, दि. १० : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात ग्रामसेवक आणि तलाठी हे गावचा कणा मानले जातात. मात्र, अनेक ठिकाणी काही तलाठी तीन ते चार दिवस फिरकतच नाहीत. त्यामुळे ग्रामस्थांना शहरात येऊन त्यांचा शोध घ्यावा लागतो.

ग्रामसेवक, तलाठी हे एक प्रकारे संपूर्ण गावाचा कारभार चालवतात. त्यामुळे ही दोन्ही पदे गावाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी तलाठी भवन उभारण्यात आले आहेत. याठिकाणी ग्रामस्थांची महसूल विषयक कामे केली जातात. मात्र, सध्या अनेक गावांमध्ये तलाठी कार्यालये ओस पडलेली आहेत. विशेषतः दूरवरच्या गावांमध्ये राहणारे तलाठी कधी फिरतात, हेच कळत नाही . त्यामुळे नागरिकांना महसूल विषयक शासकीय योजना, अनुदान आणि इतर महत्त्वाच्या कामांसाठी शहरात धाव घ्यावी लागते. काही तलाठ्यांनी तर शहरातच कार्यालय थाटले असून तिथूनच आपल्या एजंटाच्या मार्फत कामे करत असतात, हेच चित्र पहावयास मिळते.

आजही अनेक तलाठी शहरातून ये-जा करतात. त्यांची कार्यालयात यायची वेळ निश्चित नसते. मात्र, पाच वाजण्यापूर्वीच कार्यालयातून गायब होऊन तलाठी निघून जातात. त्यामुळे गावातील लोकांना त्यांना भेटणे जवळपास अशक्य होत आहे. या परिस्थितीमुळे ग्रामस्थांची अनेक कामे रखडत आहेत. तसेच शासनाच्या अनेक महत्त्वाच्या योजना, दाखले आणि अनुदानासाठी त्यांना वारंवार तलाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात.

एकेका तलाठी कर्मचाऱ्यांना महसूल मंडळातील किमान चार ते पाच गावांचा तरी कारभार पहावा लागतो. मात्र, तलाठी आज कोणत्या गावात आहेत याबाबतची माहिती ग्रामस्थांना मिळत नाही. काही तलाठी तर फक्त आठवडी बाजाराच्या दिवशीच गावात येतात. त्यामुळे एकाच दिवशी गर्दी होते आणि कामे वेळेवर होत नाहीत.

काही तलाठी सोबत खाजगी सहाय्यक ठेवतात. प्रत्येक गावात एखादा तरी असा खाजगी सहाय्यक असतो. मूळ तलाठ्याच्या अनुपस्थितीत हे डमी तलाठी कामे पूर्ण करून देण्याचे आश्वासन देतात. अनेक तलाठी शहरातून अप-डाऊन करत असल्याने गावात पूर्णवेळ उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे शासकीय कामे पूर्ण करण्यासाठी ग्रामस्थांची मोठी गैरसोय होते. शैक्षणिक प्रमाणपत्र, शेतीविषयक दाखले मिळवण्यासाठी तलाठी शोधावे लागतात.

## राज्यात पाऊस पुन्हा सक्रिय; विजांसह पावसाची शक्यता

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात पुन्हा पावसाने हजेरी लावली असून आजपासून पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यानुसार आज मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

जुलै महिन्यातील तीन चार दिवस वगळता फारसा पाऊस पडलेला नाही. त्यामुळे जुलै महिन्यात सामान्य पावसाची नोंद झाली. त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पावसाचा जोर नव्हता. मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात पुन्हा पाऊस सक्रिय झाला आहे. मुंबईसह इतर भागात पाऊस पडत आहे.



**कमी दाब क्षेत्र**

मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. पश्चिम उत्तर प्रदेश आणि परिसरावर समुद्र सपाटीपासून ३.१ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. त्यापासून झारखंडपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. तसेच कर्नाटक आणि परिसरावर समुद्र सपाटीपासून ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे कायम आहे. बंगालच्या उपसागरात बुधवारपर्यंत हवेचे कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत.

**आज पावसाचा अंदाज कुठे**

मुसळधार पाऊस – रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, लातूर, बीड, हिंगोली, धाराशिव, बुलढाणा, अकोला, वर्धा, नागपूर विजांसह पाऊस – मध्य महाराष्ट्र, मराठवाडा

**मुंबईत येत्या आठवड्यात सक्रिय**

मुंबईत मोसमी पाऊस येत्या आठवड्यात म्हणजेच उद्यापासून पुन्हा सक्रिय होणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे उद्यापासून मुंबईत पावसाचे प्रमाण तुलनेने अधिक राहील. त्याचबरोबर पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात सोमवारपासून पाऊस पडण्यास सुरुवात होईल.

**वादळाची शक्यता**

वातावरणीय परिस्थितीनुसार , तामिळनाडू किनाऱ्याजवळ वरच्या हवेतील चक्राकार वारे तयार होतील. ही विकसित होणारी प्रणाली पश्चिमेकडील मोसमी वाऱ्यांना कमकुवत करेल आणि पूर्वेकडून वारे वाहण्यास सुरुवात होईल ज्यामुळे महाराष्ट्राच्या हवामानावर परिणाम होईल, असा अंदाज खासगी हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे मराठवाडा आणि अंतर्गत महाराष्ट्रात, विशेषतः दुष्काळग्रस्त भागात, वादळाचा धोका वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भ, मराठवाडा आणि बारामतीजवळील पुणे जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात पुणे शहरात एक किंवा दोन दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**मुंबईत आत्तापर्यंत झालेला पाऊस**

हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात १ ते ९ ऑगस्टपर्यंत २३.४ मिमी तर, सांताक्रूझ केंद्रात ५३.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. साधारण ऑगस्ट महिन्यात कुलाबा केंद्रात ४८२.१ मिमी तर सांताक्रूझ केंद्रात ५६६.४ मिमी पाऊस पडणे अपेक्षित असते.

## सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युगचे हृदयपरिवर्तन होऊन तो कैरीशी विवाहबद्ध होणार का ?



**मुंबई, १० ऑगस्ट :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिका त्यातील नाट्य, भावनिक संघर्ष आणि अनपेक्षित कलाटण्यांमुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढवते आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्यातील बदलत्या नात्याची कहाणी आहे. युग एक प्रामाणिक पण तुटक स्वभावाचा वकील आहे, तर कैरी एक उत्साही तरुणी आहे, जी आपल्या भावंडांसाठी संघर्ष करत आहे. प्रेम आणि विश्वास या भावनांबद्दल तिच्या मनात सतत विचार सुरू आहेत. अलीकडच्या भागांमध्ये युगने कैरीच्या भावंडांना हे सांगून टाकले आहे की, कैरी त्यांची सख्खी बहीण नाही. त्यामुळे कैरी हताश झाली आहे आणि आपल्या भावंडांना पुन्हा आपल्या सोबत आणण्यासाठी धडपड करत आहे. युगने तिला सांगितले आहे की, त्यांना परत आणण्यासाठी ती एक सुरक्षित आणि स्थिर जीवन जगत असल्याचे तिला सिद्ध करून द्यावे लागेल, व त्यासाठी कदाचित लग्न करावे लागेल. ह्याचा फायदा घेऊन विक्रम (रजत दहिया) तोतया मजनूच्या रूपातल्या जय (तुषार धेंबला) ला कैरीसमोर आणतो आणि युग आणि कैरीचा बदला घेण्याची संधी साधतो. युग हाच खरा मजनू आहे याबद्दल अनभिज्ञ असलेली कैरी मजनूशी विवाहबद्ध होण्यास सज्ज होते. प्रेक्षकांना या भागांमध्ये नाट्यमय कलाटण्या बघायला मिळतील. कैरी लग्नास तयार होते कारण त्यामुळे आपली भावंडे आपल्याला परत मिळतील, असा तिचा समज असतो, पण या निमित्ताने काही गुपितं बाहेर येतील आणि बरीच उलथापालथ होईल. मंडपातच युग जयची खरी ओळख कैरीसमोर उघड करेल आणि तिला चुकीच्या माणसाशी लग्न करण्यापासून रोखेल. या सगळ्या घडामोडींमध्ये युगचे हृदयपरिवर्तन झाल्याचे स्पष्ट दिसू लागेल. हा तोच युग आहे, ज्याच्या मनात समस्त स्त्री जातीविषयी अत्यंत कटुता होती, ज्याने आपल्या हृदयाचे दरवाजे बंद करून घेतले होते आणि पुन्हा प्रेमात न पडण्याचा संकल्प केला होता. आता मात्र तो कैरीसाठी झगडत आहे, तिला सत्याची जाण करून देत आहे आणि तिला गरज असताना तिच्या पाठीशी उभा आहे. युगचे खरोखर हृदयपरिवर्तन झाले आहे का? कैरीविषयीच्या आपल्या भावना तो स्वतःशी कबूल करू शकेल का?

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस संमिश्र राहील. कामावर लक्ष केंद्रित करा. विद्यार्थ्यांचे मित्रांसोबत संबंध वाढू शकतात. नवीन जबाबदाजया यशस्वीपणे पार पाडाल. तुमच्याबद्दल लोक मत्सर करू शकतात.

**वृषभ :** आजचा दिवस खूप चांगला जाईल. पैशांसंबंधी चांगली बातमी मिळेल. सर्व कामे पूर्ण होतील. एखाद्या खास व्यक्तीची भेट होऊ शकते. सहकाजयांची मदत मिळेल. जीवनसाथीसोबत चांगला वेळ घालवाल.

**मिथुन :** आज तुमचे महत्त्वाचे काम वेळीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा, नाहीतर पश्चातापाची वेळ येईल. सभ्यपणे वागा आणि राग टाळा. उपजीविकेच्या क्षेत्रात, नोकरीसाठी लोकांचा संघर्ष वाढू शकतो.

**कर्क :** आजचा दिवस ठीक राहील, मनात उत्साह राहील. कामाच्या ठिकाणी दबाव वाढू शकतो. त्यामुळे संयम ठेवा. सहकाजयांची मदत मिळेल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे.

**सिंह :** तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्यक्रम घडतील. पण जीवनात अनावश्यक मतभेद निर्माण होऊ शकतात. काही महत्त्वाच्या कामात विलंब झाल्यास तुम्ही नाराज व्हाल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

**कन्या :** आजचा दिवस पूर्वीपेक्षा चांगला राहील. कुटुंबासोबत फिरायला जाऊ शकता. नवीन लोकांसोबत भेटीगाठी होतील. दिवस फारच आनंदात जाईल. नशिबाची साथ मिळेल.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी, तुमच्या कनिष्ठ आणि वरिष्ठांशी सहमती दर्शवत राहा. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. तुमचे मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळू शकते.

**वृश्चिक :** आज, काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढेल. कोणतेही पाऊल उचलताना तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने विचार करून निर्णय घ्या.


**धनु :** आज तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. प्रिय व्यक्तीपासून दूर राहिल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. व्यवसायात अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका.

**मकर :** आजचा दिवस फारच व्यस्त असणार असेल. आज आवश्यक कामे पूर्ण होतील, खर्चावर नियंत्रण ठेवा. व्यावसायिकांना लाभ होईल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे. वैवाहिक जीवन सुखमय राहील.

**कुंभ :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. संयमी वर्तन ठेवा. राजकारणाशी संबंधित लोकांना विशेष यश आणि आदर मिळेल. मित्रांसोबत तुमचे वर्तन संयमीत ठेवा आणि रागावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** वृश्चिक राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस उत्तम राहील. काम वेळेत पूर्ण होईल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. विद्यार्थ्यांना यश मिळेल. आरोग्य चांगले राहील.

## शब्दकोडे क्रमांक २१८८



**आडवे शब्द :-**

१) सुरळीत चालू असलेल्या कामास अडथळा निर्माण करणे या अर्थाची म्हण
८) कहाणी
९) मिठी
१०) सोन्याचा धागा
११) छाती
१२) एक तारवाद्य
१३) मणका
१५) बागेतील किंवा रानातील सहल, जेवण इ.
१७) मेदिनी
१९) चुकवणारा
२१) मौल्यवान रत्ने
२३) एकत्र जमलेल्या लोकांचा समूह
२४) सर्वत्र सांगत सुटणे
२६) नमस्कार
२७) करगोटा
२९) गावाचा कारभार पाहणारा
३२) पशू
३४) सक्षम ✻✻✻ रामदासस्वामी
३६) उपस्थित
३७) प्रचंड, मोठा
३८) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
३९) मोठा समुद्र
४०) वाळ्याचे सुगंधी मूळ
४२) टिकून राहाणे
४४) कवाड
४५) तरतरी आणणारे एक उष्ण पेय
५०) रंग (इं.)
५१) बेडकांचे ओरडणे
५४) पुरुष
५५) सारखा
५६) एक तारवाद्य
५७) व्यापारी फायदा
५९) एकाद्या कार्यास आयुष्य वाहणे
६३) कप्पा, खण
६४) चांदी
६६) मोठी जाड सुई
६७) व्रत
६९) कच्चा पूल
७१) सदन
७२) आश्चर्य
७३) अथवा
७४) सर्वस्व
७५) धातूचा धागा

**उभे शब्द :-**

१) गडीमाणसे
२) बारीक केस
३) पशुंची गर्भावस्था
४) शरम
५) लापशी
६) एक खाद्य पदार्थ
७) गावजेवण
८) गुणांची चाहा करणारा
१२) खळबळ उडवून देणारी (घटना )
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) अंजनाचा एक प्रकार
१५) पाट्याचा जोडीदार
१६) लोक, प्रजा
१८) मलई
२०) वेळ, मृत्यू
२२) शेत, जाणे येणे
२५) कडू चव
२८) व्यायाम
२९) श्रीकृष्णाचे एक नाव
३०) लाट
३१) मानवी कत्तल
३२) उग्र, मवाळच्या विरुद्ध
३३) युद्धासाठी उत्सुक असलेला
३४) विषम च्या विरुद्ध
३५) मंदिराचा मुख्य दरवाजा
३७) दौंड जवलचे एक रेल्वे जंक्शनचे गाव
४१) श्रीविष्णूचे दहा अवतार
४३) जाणे
४५) चालणे, चालू नाणे
४७) शुद्ध, पवित्र
४९) जय पराजय
५०) अर्ध वर्तुळाकार
५२) ढीग
५३) वाघ–सिंहाचे ओरडणे
५५) सदोदित
५८) विवाहविच्छेद
६०) कैफ, धुंदी
६१) मजबूत, दणकट
६२) पडणे
६५) वेगवान
६८) प्रामाणिक
७०) अवधान, लक्ष
७१) दाट, ढग

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्यांतील गोडवा वाढवा : जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे प्रतिपादन

## ओझर येथे हजारो भाऊ बहिणींचा सामूहिक रक्षाबंधन सोहळा उत्साहात





**ओझर ।** आपल्या भारतीय संस्कृतीत भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला विशेष महत्व आहे. मात्र या नात्यातील दुरावा वाढत चालल्याचे अनेकदा पाहायला मिळते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रत्येक भावाने बहिणीच्या रक्षणाचा संकल्प करावा. बहिणीच्या अडचणीच्या काळात धावून जावे. आणि बहिणीनेही हिस्सा मागून आपल्या भावाच्या संसारात अडचण निर्माण करू नये. असे सांगतांनाच बहीण-भावाच्या पवित्र नात्यातील गोडवा टिकून ठेवण्यासाठी रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रत्येक भाऊ बहिणीने भेट म्हणून वृक्षारोपणासाठी खास करून फळ झाडे द्यावे असे प्रतिपादन निष्काम कर्मयोगी जगदगुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज धर्मपिठाचे पिठाधिश्वर अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी केले.

जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने ओझर येथील देवभूमी "जनशांती धाम" येथे हजारो भाऊ बहिणींच्या सामूहिक रक्षाबंधनाचा सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्कार, एकोपा आणि सामाजिक ऐक्याचे जिवंत दर्शन यानिमित्ताने घडले.कार्यक्रमाचा प्रारंभ पहाटे भगवान बाणेश्वर महादेव व जगदगुरु बाबाजींच्या श्री मूर्तीचे अभिषेक पूजनाने करण्यात आला. यानंतर नित्य नियम विधी,आरती,सत्संग संपन्न झाला.चांदीच्या रथासह लक्षवेधी पालखी मिरवणूक संपन्न झाली. मातोश्री म्हाळसामाता व मातोश्री फुलामाता यांच्या पुण्यस्मरणार्थ ओझर येथे होणाऱ्या महिला धर्म सोहळ्याचे ध्वजारोहण मोठ्या उत्साहात संपन्न झाले.यानंतर आयोजित हजारो भाऊ बहिणींच्या सामूहिक रक्षा बंधन सोहळ्या प्रसंगी पंडित विलास गुरु कुलकर्णी व पंडित किरणगुरु लाडसावंगीकर यांच्या मंत्रघोषात हा सोहळा संपन्न झाला.यावेळी व्यासपीठावर जनेश्वरगिरीजी महाराज,प्रवक्ते विवेकानंद महाराज, ब्र.रामानंद महाराज,दिव्यानंद महाराज, श्रीपादानंद महाराज,दयानंद महाराज यांसह आश्रमीय संत उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमात सहभागी झालेल्या हजारो भाविकांना अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, आपल्या भारतीय संस्कृतीत अनेक सण-उत्सव येत असतात मात्र बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचा उत्सव म्हणजे रक्षा बंधनाचा वैशिट्यपूर्ण असा हा सोहळा असतो. भावाने राखी पौर्णिमेच्या निमित्ताने बहिणीच्या रक्षणाचा आणि बहिणीच्या अडचणीच्या काळात मदत करण्याचा संकल्प करावा. तसेच बहिणींनी देखील आपल्याला सासरी हिस्सा मिळालेला असल्याने भावाकडे हिस्सा मागून भावाच्या संसारात अडचण निर्माण होईल असे वागू नये."राखी हे बहीण भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असून त्यामागे प्रेम, विश्वास आणि जबाबदारीचा भाव आहे. आजच्या युगात या मूल्यांचा वारसा जपणे आवश्यक आहे. आजच्या दिवसाची आठवण म्हणून प्रत्येक भाऊ बहिणीने वृक्षारोपण करण्यासाठी फळ झाडे भेट म्हणून द्यावे असेही यावेळी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज म्हणाले. संघबद्धतेचा हा पवित्र सोहळा भविष्यातही अधिक भव्य रूपात साजरा करण्याचा संकल्प जय बाबाजी भक्त परिवाराने व्यक्त केला.यावेळी संपूर्ण परिसर 'रक्षा बंधनाच्या' पवित्रतेने भारावून गेला होता.यावेळी आश्रमीय संत,विश्वस्त मंडळ, कार्यकारी समिती,सल्लागार समिती व नियोजन समितीचे सदस्य व हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.दर्शन व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला.


### वारसा विश्वासाचा, पी. एन. गाडगीळ आता शरणपूर रोड नाशिक येथे!

**नाशिक ।** मनमोहक आणि उत्तमोत्तम दागिने ग्राहकांना देण्याऱ्या 'पीएनजी ज्वेलर्स'चा वारसा सुरू झाला १८३२ मध्ये ! या वारशाचा विस्तार आता आपल्या नाशिक येथे सुरू होत आहे. शॉप नं. जी-१, सुयोजित संकुल,



**अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते उद्या उद्घाटन**

राजीव गांधी भवनजवळ (एनएमसी), शरणपूर रोड. येथे 'पीएनजी ज्वेलर्स'च्या भव्य शोरूमचे उद्घाटन उद्या १२ ऑगस्ट २०२५ रोजी, सकाळी ११.३० वाजता. प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. सौरभ गाडगीळ, पराग गाडगीळ, श्रीमती. कांचनबेन नवीनचंद्र शहा, दुर्गेश शहा,सुकेश शहा,मुकेश शहा, संयम शहा, जितेश शहा, जिग्नेश शहा, स्मित शहा आदींनी केले आहे


# 'बीज राखी'तून पर्यावरणपूरक सण साजरे करण्याची प्रेरणा : ॲड. नितीन ठाकरे

## केटीएचएम महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बनविल्या पर्यावरणपूरक राख्या






**नाशिक ।** केटीएचएम महाविद्यालयातर्फे राबविण्यात आलेला 'बीज राखी' उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, या उपक्रमामुळे समाजामध्ये पर्यावरणपूरक सण साजरे करण्याविषयी जनजागृती निर्माण होण्याची प्रेरणा मिळेल. पर्यावरण, जैवविविधता, दुर्मिळ व प्रादेशिक वनस्पतींच्या बीज संरक्षणाचा संदेशही समाजापर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

केटीएचएम महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागात "बीज राखी" हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उदघाटन सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते झाले. उदघाटनप्रसंगी बोलतांना बीज राखी या संकलपनेचे व उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमाच्या निमित्ताने या कार्यक्रमास मविप्रचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, डॉ. सयाजीराव गायकवाड, रमेश पिंगळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे उपस्थित होते. या उपक्रमात एकूण ६३ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. सरचिटणीस ॲड. ठाकरे, प्रमुख पाहुणे व प्राचार्यांनी विद्यार्थिनींनी बनविलेल्या बीज राख्या न्याहाळत कौतुक केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. ए. खैरनार यांनी प्रास्ताविक केले व हा उपक्रम राबविण्यामागचा हेतू सांगितला. वैशाली कोकाटे, सुजाता मगदूम व मयुरा पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. उपक्रम यशस्वीतेसाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. आर. के. पाटील, रमाकांत पाटील, डॉ. ज्ञानेश्वर खांडबहाले, डॉ. विठ्ठल सोनवणे, डॉ. सोनाली देवरे व इतर सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सप्तश्रृंग गडावर शालेय विद्यार्थीनीचा वृक्षांना राख्या बांधून अनोखा रक्षाबंधन

**सप्तश्रृंग गड ।** आदिवासी सेवा समिती संचलित, प.पू. ओम दत्त श्री ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्रीसप्तश्रृंगी गड येथे मुख्याध्यापक शशिकांत देसले यांच्या मार्गदर्शनाने



विज्ञान छंद मंडळ अंतर्गत पर्यावरणपूरक वृक्षरक्षाबंधन साजरे करण्यात आले.विद्यार्थ्यांनी प्रतिभा बोरस्ते व सिमा गांगुर्डे या शिक्षकांच्या मार्गदर्शनाने राखी निर्मिती कार्यशाळेत सहभाग घेतला.नैसर्गिक साधनांचा वापर करून निरनिराळ्या राख्या बनविल्या.राख्या बनविण्यासाठी सूत, कापूस,दोरा,सुतळी, तृणधान्य,टरफले,काडी रंगीत कागद,रंग,पाने, फुले या साधनांचा वापर केला.विद्यार्थ्यांनी या राख्या शालेय परिसरातील वृक्षांना बांधल्या.विद्यार्थ्यांनी झाडांना नैसर्गिक राख्या बांधून झाडांच्या संरक्षणाची जबाबदारी स्विकारली व वृक्षरक्षेचा नवीन संदेश दिला.विद्यार्थ्यांनी असे अनोखे पर्यावरणपुरक वृक्षरक्षाबंधन साजरे केले.राखी बनविण्याच्या खर्चातून पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदीचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

# जनता विद्यालय कोमलवाडीत अनोखं पर्यावरण पूरक रक्षाबंधन



**नाशिक ।** जनता विद्यालय कोमलवाडी येथे राखी तयार करण्याचा उपक्रम घेण्यात आला होता. रक्षाबंधनचा सण म्हणजे बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचा अनमोल धागा. आपले संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने राखी तयार करणे हा नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यालयात घेण्यात आला. विद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभागी झाले.

टाकाऊ पासून टिकाऊ तसेच पर्यावरणपूरक राख्या विद्यार्थ्यांनी तयार केल्या. तसेच राख्या तयार करून वृक्ष हे देखील आपले संरक्षण करतात म्हणून भावाच्या नात्याने त्यांना देखील राखी बांधण्यात आली असा उत्कृष्ट उपक्रम विद्यालयात राबविण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक, बाजीराव ढोमसे, सचिन गीते, सागर भदाणे, मनीषा गोराडे, स्वाती जोंधळे, चित्रा बाजारे, ऋतुजा वाघ, कीर्ती गवारे, शितल रायते, सुदर्शन गांडुळे, सागर बस्ते, सौरभ कमानकर, शरद टेमगर यांसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्षाबंधनच्या पार्श्वभूमीवर बहिणीला तत्काळ नवीन वीजजोडणी

## महावितरणने दिली प्रकाशाची भेट



**लासलगाव ।** येथील कचरा डेपो जवळील आदिवासी वस्ती मध्ये राहणाऱ्या श्रीमती छाया अंबादास पवार, यांचे २ खोल्यांचे पत्राचे घर, ज्यामध्ये त्या आपल्या एक मुलगा आणि सुनबाई सोबत राहतात. घरामध्ये लाईट नाही, लाईट घ्यायची तर कागदपत्रे स्वतःचे नावाने नाही, आणि लाईट घ्यायला खूप खर्च येतो असा त्यांचा समज, पण किती दिवस अंधारात राहायचे ? म्हणून त्या महावितरणच्या लासलगाव शहर कक्षाच्या कार्यलयात पोहचल्या आणि अभियंता यांच्या पुढे त्यांनी आपली व्यथा मांडत जवळ असलेले आधार कार्ड आणि वोटिंग कार्ड कागदपत्रे समोर ठेवली.

अशा परिस्थितीत जागेची मालकी नसताना वीज जोडणी कशी द्यायची म्हणून शहर अभियंता अजय सावळे ह्यांनी कार्यकारी अभियंता केशव काळूमाळी आणि उपकार्यकरी अभियंता दत्तात्रय पुंडे यांचे मार्गदर्शन घेत त्याप्रमाणे वीज कर्मचारी विशाल गोरे यांना सांगून, अवघ्या दोन दिवसात स्वतः त्यांचे कागदपत्रे आणि ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करून घेतली आणि अवघ्या 620 रुपये इतके त्यांचे कोटेशन भरून घेतले. वीजजोडणीसाठी लागणारे सर्व सामग्री घेऊन लासलगाव शहर कक्षातील कर्मचारी वर्ग ह्यांनी रक्षाबंधनच्या पूर्व संध्येला छाया यांच्या घरी तात्काळ वीजजोडणी करून प्रकाश करून दिला.

> रक्षाबंधनच्या पूर्व संध्येला घरात लाईट लागल्या नंतर छायाताईंच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य बघून महावितरण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बंधुत्व कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मिळाले.
>
> **- अजय साबळे, लासलगाव शहर अभियंता**

सदर जोडणी करतांना वरिष्ठ तंत्रज्ञ दीपक जाधव, प्रतीक घुमरे, विशाल गोरे, हरीश भागवत, समाधान साठे, किरण देवरे, शशिकांत जाधव, सुदर्शन शिंदे, लक्ष्मण हिरे, रवींद्र पवार आणि रवींद्र कोळी उपस्थित होते.

# वृक्षांकडून दातृत्वाचा गुण घ्यावा : प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे

## विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**निफाड ।** वृक्ष सृष्टीला फळे, फुले, प्राणवायू देतात. जीवसृष्टीचे ऊन, वादळ, पाऊस यापासून संरक्षण करतात. मातीची झीज थांबवतात. झाडांची फळं ते मुळं सगळ्यांचा सृष्टीसाठी वापर होतो. याबदल्यात त्यांना आपल्याकडून कुठल्याही प्रकारची अपेक्षा नसते. त्यांना इतरांना देणे हेच माहीत असते. त्यांच्या या दातृत्वामुळे पृथ्वीवरती मानवी जीवन विकसित झाले. मानवी संस्कृती निर्माण झाली.मानवाने वृक्षाप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या संवर्धनाचे काम केले पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे यांनी व्यक्त केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रा. योगेश कडलग, प्रा अभय वडघुले, प्रा. दीपाली जेउघाले, प्रा. सारिका खापरे, प्रा. भाऊसाहेब मुंतोंडे, प्रा. शंकर गायकवाड, प्रा. मोनाली बोराडे



आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. ढगे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शेतात, मोकळ्या परिसरात, गाव, शाळा, महाविद्यालये आदी परिसरात चिंच, आंबा, पेरू, जांभूळ, आवळा आदी प्रकारची फळझाडे सोबत दीर्घकाळ टिकणारे वड, पिंपळ, कडुलिंब आदी वृक्ष लावावेत. घराभोवती सुंदर फुलझाडे लावून परिसर निसर्गमय करावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख भाऊसाहेब मुतोंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका खापरे यांनी केले, तर आभार प्रा दीपाली जेउघाले यांनी मानले.

# शिक्षणाने माणूस घडतो तर माणुसकीने समाज घडतो : भास्कर कदम

**दिंडोरी ।** शिक्षण आयुष्याची शिदोरी आहे, शिक्षणाने माणूस घडतो, माणुसकीने समाज घडतो. शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन सुशिक्षित व्हा, असे विचार प्रमुख पाहुणे भास्कर कदम यांनी व्यक्त केले. दिंडोरी तालुक्यातील पिंपळनेर येथील पंडित धर्मा पाटील विद्यालयातील आपल्या भाषणात त्यांनी हे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष चिंतामण खांदवे होते. पिंपळणारे ग्रामपंचायतीच्यावतीने सदर शाळेस सीसीटीव्ही कॅमेरे प्रदान केल्याबद्दल तसेच ग्रामपंचायत सदस्य मनोज खांदवे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय वस्तू भेट दिल्याबद्दल कृतज्ञता समारंभ सदर शाळेत आयोजित करण्यात आला होता.



प्रारंभी उपस्थित पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक राजू राठोड यांनी कृतज्ञाता सोहळ्याचा हेतू आपल्या प्रास्ताविकात सांगितला. भास्कर कदम यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, ग्रामपंचायत पिंपळणारे यांनी शाळेस सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध करून दिले, हे कार्य खरोखर विद्यार्थ्यांच्या दृष्टीने व सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागामध्ये बऱ्याचशा शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नसतात; परंतु या शाळेमध्ये ग्रामपंचायतीने केलेले कार्य खरोखर कौतुकास्पद आहे. तसेच वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय वस्तूंचे वाटप मनोज खांदवे यांनी केले, शाळेसाठी लोकसहभाग महत्वाचा असून हा आदर्श इतरांनीही घ्यावा, असे आवाहनही कदम यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. याप्रसंगी आर. के. खांदवे, बाळू जगताप यांची समयोचित भाषणे झाली. लोक सहभागातून शाळेचा दर्जा व विद्यार्थी यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी मुख्यध्यापक राजू राठोड व त्यांचे सहकारी जे परिश्रम घेत आहेत, त्यांचे कौतुक सर्वांनी केले. यावेळी कदम यांनी ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे संपादित राजर्षी शाहू महाराज यांच्या पुस्तिकाच्या संचासह नांदगाव ते लंडन व उजेड पेरायचा आहे, ही पुस्तके भेट दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजू राठोड तर सूत्रसंचालन गायकवाड यांनी केले. प्रारंभी शालेय विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमासाठी गावातील सरपंच छगन कडाळे, उपसरपंच वैशालीताई खांदवे, सदस्य मनीषाताई शेखरे, विठ्ठल साळुंखे, ग्रामसेविका अहिरे, शालेय समिती सदस्य सदू खांदवे, रामचंद्र खांदवे, ज्ञानदेव घाडगे, बाळाप्पा खांदवे, समाधान खांदवे, योगेश खांदवे, रमणलाल साळवे, प्रभाकर साळवे, समाधान शिरसाठ, द्वारकानाथ खांदवे, शिवाजी बोराडे, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष दिलीप साळवे, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष दिलीप खांदवे इत्यादी उपस्थित होते. पालवी, ठाकरे, बहिरम, काळे, चौधरी आदी शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले.




अबला, अज्ञानी, अजाण महिलांच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावरच असल्याच्या पुरुषी मानसिकतेने काही सणांच्या माध्यमातून हे दुय्यमत्व महिलांवर लादलं. राखीपौर्णिमा हा असाच एक सण. यात बहीण-भावातील नाजूक बंध दृढ करण्याचं उचित प्रयोजन असलं तरी केवळ भावानेच बहिणीचं संरक्षण करावं ही शिकवण कालबाह्य झाली आहे. त्याऐवजी दोघांनीही एकमेकांची काळजी घ्यावी या उपदेशासह हा सण साजरा व्हावा.



## लाभ शिवपूजनाचे...



श्रावण महिन्यात शंकराच्या पूजनाचं महत्त्व असतं. या महिन्यात शंकराची पूजा केल्याने कोणते लाभ होतात याविषयी...

* श्रावण महिन्यात शंकराच्या पिंडीतून इतर दिवसांच्या तुलनेत १०८ पटींनी जास्त ऊर्जा बाहेर पडते. श्रावण महिन्यातला सोमवार शिवपूजनाच्या दृष्टीने अत्यंत पवित्र मानला जातो.
* मनापासून आणि समर्पित भावनेने केलेल्या शिवपूजनामुळे ग्रहदोषांचा आणि त्यातही शनीदोषाचा वाईट प्रभाव दूर होऊ शकतो. श्रावणातल्या एखाद्या सोमवारी रूद्राभिषेक पूजा केल्याने मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याचा लाभ होतो.
* श्रावणमासात उपवास आणि शिवपूजन केल्याने भक्ताच्या सगळ्या इच्छा-आकांक्षा पूर्ण होतात.
* शिवपूजनाने भक्तमंडळींचं शारीरिक आरोग्य सुधारतं. या काळात आरोग्यविषयक अनेक लाभ मिळतात.
* या दिवसात महामृत्यूंजय मंत्र तसंच ओम नम: शिवाय या मंत्राचा जप केल्याने अपमृत्यू आणि इतर संकटांपासून संरक्षण मिळतं. शंकराच्या पूजनाने मोक्षप्राप्तीचा मार्ग मोकळा होतो.
* श्रावणातल्या सोमवारी केलेल्या दानामुळे ज्योतिर्लिंगांच्या दर्शनाचं पुण्य मिळतं. श्रावणी सोमवारच्या व्रतामुळे भक्ताचं आणि त्याच्या कुटुंबियांचं आरोग्य सुधारतं. त्यांचं संकटांपासून रक्षण होतं.
* श्रावणमासाच्या काळात शिवतत्त्व अधिक प्रभावी असतं. शिवपूजन करून भाविक याचे लाभ मिळवू शकतात. ओम नम: शिवायचा मंत्र जपून या तत्त्वाला आकर्षित करता येईल.
* या काळात रूद्राक्ष परिधान केल्याने अधिक चांगला परिणाम साधला जातो. तसंच जप करण्यासाठी रूद्राक्ष माळेचा वापर केल्याचेही अनेक लाभ आहेत.

जाणून घ्या

## रक्षाबंधनाच्या निमित्ताने...

भक्ती विशेष

भावाबहिणीचे हे नाजूक बंध आपल्या जीवनपद्धतीचा हळवा कोपरा आहेत. विविध सणांच्या निमित्ताने या नात्याला उजाळा देण्याचा प्रयत्न होतो. राखी पौर्णिमा हा देखील असाच एक सण. महिलांची अबला ही प्रतिमा समाजासमोर होती तेव्हा तिच्या संरक्षणाची जबाबदारी कोण्या पोलादी हातात असावी, या संरक्षणाचं भान त्या हातांना रहावं या भावनेने कदाचित हातावर राखी बांधणाऱ्या या सणाचं प्रयोजन केलेलं असावं. राखी पौर्णिमेच्या दिवशी बहीण भावाच्या हातावर राखी बांधते. औक्षण करुन त्याचं शुभ चिंतते. गोडाधोडाच्या जेवणाने हसता-खेळता हा सण पार पाडतो. वर्षानुवर्षं याच उत्साहात हा दिवस साजरा होत आला आहे. काळानुरुप राखीचे प्रकार बदलले. मोराची, मण्यांची, स्पंजची, गोंड्यांची, चंदेरी झिरमिळ्या असणारी असा प्रवास करत आजची राखी सोन्या-चांदीपर्यंत येऊन पोहोचली आहे. नाजूक रेशीमबंधांची जागा छोट्या साखळीने घेतली आहे. प्रत्यक्ष राखी बांधणं शक्य नसलं तर एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी व्हर्च्युअल वर्ल्डही आज सिद्ध आहे. त्यासाठी पोस्टाचं माध्यम वापरण्याची गरज आज अभावानेच जाणवते. पण या बदलत्या वातावरणात राखी पौर्णिमेचा उत्साह तसूभरही कमी झालेला नाही. या सणाच्या निमित्ताने बदलत्या स्त्रीविषयक परिस्थितीचा मात्र नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पूर्वी स्त्री घराच्या चार भिंतीमध्ये कोंडलेली होती. तिच्या कार्यकक्षा तेवढ्यापुरत्या सीमित होत्या. शारीरिक ताकदीबाबत पुरुषांपेक्षा कमकुवत असणाऱ्या स्त्रीच्या मनाची शक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानग्रहणाची शक्ती समाजाने ओळखली नव्हती. अशा परिस्थितीत तिच्या भरणपोषणाचा, संरक्षणाचा सगळा भार पुरुषांनी आपल्या खांद्यावर घेतला. पुरुष, मग तो कोणत्याही नात्याने तिच्या आयुष्यात आलेला असो; त्याला ही स्वत:ची जबाबदारी असल्याची जाणीव अगदी लहानपणापासून देण्यात येऊ लागली. म्हणूनच आपल्यापेक्षा पाच-सात वर्षाने मोठ्या असणाऱ्या बहिणीची जबाबदारी त्या लहानग्या जीवावर देताना समाजाला काही चुकीचं वाटलं नाही. याच संस्कारात वाढलेला तो जीव मोठेपणी समजुतीच्या या दबावाखालीच बहिणीची जबाबदारी सांभाळू लागला. अशा प्रकारे जबाबदारीचं ओझं वाढतं तेव्हा अधिकाराची वाणी बुलंद होऊ लागते. वर्चस्व गाजवण्याची प्रवृत्ती वाढते. आपलाच शब्द प्रमाण असल्याचा आग्रह धरला जातो आणि बहिणीवर नानाविध नियमांचे अंकुश लावण्याची वृत्ती उफाळून येते. काही वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेतला तर घरातल्या मोठ्या पुरुषांच्या वर्चस्वाबरोबरच समवयस्क भावांचा जाच अथवा धाक असणाऱ्या महिलांची संख्या किती मोठी याचा सहज अंदाज येतो. पण आता परिस्थिती बदलली आहे. त्यामुळेच राखी पौर्णिमेच्या निमित्ताने बांधल्या जाणाऱ्या राखीचं भावाला बंधन वाटता कामा नये की कोण्या बहिणीला ही संरक्षणाची याचना असल्याची बोच वाटू नये. बंधनात राहण्याची सक्ती करणारं हे कोणतंही गठबंधन नाही तर मनाचे धागे जोडणारा सुरेख क्षण आहे इतकंच.



एखाद्याला संरक्षणाची गरज असल्याचं सूचित केलं जातं तेव्हा त्याची निर्बलता, अगतिकता, असामर्थ्य एक प्रकारे अधोरेखित होत असतं. किंबहुना, हे गृहित धरुनच कोणावर तरी ही जबाबदारी सोपवली जाते. मात्र आज परिस्थिती वेगळी आहे. आजची स्त्री पुरुषांइतकीच, किंबहुना त्यांच्यापेक्षा काकणभर जास्तच सशक्त आहे. तिची ही ताकद अनेक प्रकारे आणि अनेक पातळ्यांवर सिद्ध झाली आहे. पूर्वीची वड-पिंपळाच्या तुळशीच्या प्रदक्षिणांमध्ये अडकलेली स्त्री आज पृथ्वीला प्रदक्षिणा घालणाऱ्या अंतरिक्ष केंद्रामध्ये राहून आली आहे. आधी उंबराही न ओलांडलेल्या महिलेने आज अत्यंत आत्मविश्वासाने स्पेस वॉक केला आहे. भारताच्या अंतरिक्ष संशोधक गटामध्ये एका स्त्रीची निर्णायक भूमिका समस्त भारतीयांची मान उंचावून जाते. यापूर्वी तिने आकाशाला गवसणी घालत विमान चालवलं आहेच. आता तर शत्रूचा नि:पात करणाऱ्या लढाऊ विमानांच्या सारथ्यगटाचाही ती एक भाग आहे. ती कमांडो बनून अतिरेक्यांना कंठस्नान घालत आहे. वन्यजीवांचं रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी घनदाट जंगलातून गस्त घालत आहे. नक्षलग्रस्त भागांमधील गस्ती पथकामध्ये तिचा सहभाग आहे. आज ती विविध वाहनांची चालक आहे, वाहक आहे आणि मालकही आहे. शिक्षण, आरोग्य संशोधन, संवर्धन, हॉटेल मॅनेजमेंट, कला कौशल्य, पाकशास्त्र, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांमध्ये तिचा सहभाग उल्लेखनीय ठरतोय. इतकंच नव्हे, तर या आणि अशा क्षेत्रांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक सरस ठरणारी तिची कामगिरी हा कौतुकाचा विषय आहे. उपजत चिकाटी, परिश्रम घेण्याची अपार क्षमता, परिस्थितीप्रमाणे जमवून घेण्याची लवचिकता, अफाट मनोबल, दुसऱ्याला जाणून घेण्याची नैसर्गिक प्रेरणा, स्वभावातील मार्दव आणि ममत्व अशा एक ना अनेक गुणांचा समुच्चय असणारी स्त्री आज कोणत्याच बाबतीत पुरुषांवर अवलंबून नाही. म्हणूनच जवळपास प्रत्येक क्षेत्रातील आस्थापनांमध्ये वरिष्ठ पदांवर महिला राज पहायला मिळतं. थिंक टँकमध्ये महिलांचा वरचष्मा बघायला मिळतो. स्पर्धा परीक्षांच्या यशस्वितांच्या यादीत युवतींच्या नावाची गणती अधिक आढळते. त्यामुळेच आता त्यांना कोणी संरक्षण देण्याची गरज नाही. त्या स्वत:चंच नव्हे तर इतरांच्या संरक्षणासाठीही सिद्ध आहेत.

आज खरी गरज आहे ती ज्या मनगटांवर राखी बांधली जाते त्या पुरुषांनी स्त्रीविषयक जाणिवा सुधारण्याची. तिचं समाजस्थान मान्य करण्याची आणि त्यानुसार वागणुकीत बदल करण्याची. स्त्रीवरील वाढत्या अत्याचारांच्या घटना अत्याचारी व्यक्तीच्या जाणिवा प्रगल्भ नसल्यामुळे घडतात. बंधू हे व्यक्तिसापेक्ष नातं आहे. मात्र बंधुत्व ही सर्वव्यापी संकल्पना आहे. ती आचरणात आणली तर परस्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची हिंस्त्र आणि पाशवी वृत्ती कमी झाल्याशिवाय राहणार नाही. कारण एखाद्या मुलीवर पाशवी अत्याचार करतो तो कोणाचा तरी भाऊच असतो. आपल्या बायकोचा छळ करतो, तिला आत्महत्येला प्रवृत्त करतो तोही कोणाचा तरी भाऊच असतो. घरामध्ये बहिणीकडून राखी बांधून घेणारा भाऊ बाहेर असं कृत्य करतो तेव्हा त्याच्या अप्रगल्भ आणि अविकसित मानसिकतेचंच दर्शन घडतं. या एका कृत्यात एखाद्या महिलेचं संपूर्ण जीवन उद्ध्वस्त होतं. तिचं कुटुंब कोलमडतं. म्हणूनच जबाबदारी घ्यायची असेल तर भावाच्या नव्हे तर बंधुत्वाच्या जाणिवेने घ्यावी. आज या अर्थाने रक्षाबंधनाचं महत्त्व मुलांना पटवून द्यायला हवं. आज स्त्रियांना संरक्षणापेक्षा जास्त गरज आहे ती सन्मानाची. त्यांना घरात सन्मान मिळावा, समाजात सन्मान मिळावा, त्यांच्या गुणांचं मुक्त कंठानं कौतुक करावं, त्यांच्या क्षमतांचा स्वीकार करावा आणि त्यानुसार उचित स्थान मिळावं. आज त्यांना या सर्वांची गरज आहे. ही गरज पूर्ण झाली तरच त्या निर्भय मनाने आपल्या क्षमता आणि कौशल्याचा वापर करुन समाजासाठी सर्वोत्तम योगदान देऊ शकतील.

## श्रावणातल्या कहाण्या...

परंपरा

श्रावण महिना साजरा करण्याच्या प्रथा, परंपरा, पद्धती काळानुरूप बदलल्या आहेत. श्रावणाशी संबंधित अनेक प्रथा-परंपरा महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी एक म्हणजे श्रावणातल्या कहाण्या. श्रावणातल्या प्रत्येक वाराची, प्रत्येक सणाची कहाणी आपल्याकडे सांगितली जाते. **आटपाट नगर होतं** पासून सुरूवात होऊन **साठा उत्तराची कहाणी सुफळ संपूर्ण...** असा कहाण्यांचा शेवट असतो. या कहाण्या कोणी रचल्या, कोणी लिहिल्या हे अज्ञात असलं तरी ही परंपरा आजही टिकून आहे. महिलांनी एकत्र यावं, विचारांचं आदानप्रदान व्हावं, कहाणी सांगण्याच्या निमित्ताने एकमेकांशी संवाद साधला जावा, असा यामागचा उद्देश असावा. श्रावणातली व्रतवैकल्यं या कहाण्यांशिवाय पूर्णत्त्वास जात नाहीत.

श्रावणमासातल्या काही कहाण्यांमध्ये देवदेवतांचं महात्म्य वर्णन केलेलं असतं तर काहींमधून त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचं वर्णन केल्याचं दिसून येतं. या कहाण्यांमधून विशिष्ट संदेश दिला आहे. हा संदेश आजच्या काळतही तितकाच लागू पडतो. कहाण्यांची रचना अत्यंत आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे. त्यातली वाक्यं लयबद्ध आहेत. कथांमध्ये आवर्तनं आहेत. या कहाण्या वाचल्यानंतर मनाला अनोखं समाधान लाभतं. या कहाण्या म्हणजे आपल्या परंपरांचं संचित आहे. श्रावणमासानिमित्ताने कपाटात दडलेली कहाण्यांची पुस्तकं बाहेर येतात. या कहाण्या सामूहिकपणे वाचल्या जातात. छोटी शहरं आणि गावांमध्ये आजही ही परंपरा टिकून आहे. शहरातल्या महिलाही या कहाण्या आवर्जुन वाचतात.




सोमवारची खुलभर दुधाची कहाणी सांगितली जाते. हंडे हंडे दूध ओतूनही न भरणारा गाभारा म्हातारीच्या वाटीभर दुधाने भरतो. आपल्या लेकरांबाळांचं, प्राणीमात्रांचं करून मगच परमेश्वराचा विचार करावा, त्याचं पूजन करावं, असा संदेश यातून देण्यात आला आहे. तर शुक्रवारच्या गरीब बहिणीच्या कहाणीतूनही आपण बरंच काही शिकू शकतो. काळ बदलला असला तरी गरीब-श्रीमंत ही दरी आजही कायम आहे. गरीबीचा आजही दुस्वास केला जातो. गरीब माणसं आजही अपमानीत होतात. किंमत माणसाची नाही तर त्याच्या संपत्तीची होत असते, हे या कहाणीतून जाणवतं. या कहाण्या म्हणजे लोकवाङ्मय. याची चिरंतन जपणूक व्हायला हवी. या कहाण्यांमधलं सार घेऊन पुढे जायला हवं. हा कहाण्यांमधली रंजकता, त्याचा गोडवा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. तरच पुढच्या अनेक पिढ्या या कहाण्यांचं श्रवण आनंदाने करतील.

## लक्षण रजोगुणांची...

दुसऱ्या दशकातल्या पाचव्या समासात समर्थ रामदास रजोगुण लक्षणांचं वर्णन करतात. ते म्हणतात की मुळी देह त्रिगुणाचा। सत्त्वरच तमाचा। त्यामध्यें सत्त्वाचा उत्तम गुण। ।१।। सत्त्वगुणे भगवतभक्ती रजोंगुणे पुनरावृत्ती। तमोगुणे अधोगती। पावती प्राणी।।२।। त्यांतहि शुद्ध आणि सबळ। तेहि बोलिजेति सकळ। शुद्ध तेचिं जे निर्मळ। सबळ बाधक जाणावें।।३।। शुद्धसबळाचे लक्षण। सावध परिचा विचक्षण। शुद्ध तो परमार्थी जाण। सबळ तो सांसारिक।।४।। तया संसारिकांची स्थिती। देहीं त्रिगुण वर्तती। येक येतां दोन्ही जाती। निघोनियां।। ५।।

याचा अर्थ असा की हा देहच मुळात तीन गुणांचा आहे. सत्त्व, रज आणि तम असे हे तीन गुण. सत्त्व हा त्यामधला उत्तम गुण. सत्त्वगुणामुळे भगवंतभक्तीची प्राप्ती होते. रजोगुणांमुळे पुनरावृत्ती होते तर तमोगुणांमुळे प्राण्यांना अधोगती प्राप्त होते. गुणांचे शुद्ध आणि सबळ असे दोन भेद आहेत. शुद्ध ते निर्मळ तर सबळ अशुद्ध आणि बाधक असते. शुद्ध आणि सबळ यांची लक्षणं मी सांगतो. ती सर्वांनी सावधपणे ऐकली पाहिजेत. शुद्ध गुण पारमार्थिक असतो तर सबळ गुण प्रापंचिक असतो. प्रापंचिक माणसाच्या देहात तिन्ही गुण वास करून असतात. त्याच्या देहात तिन्ही गुणांचे कार्य चालते. एक गुण वरचढ झाला की दुसरे दोन्ही क्षीण होतात.

यापुढे समर्थ रजोगुणांची लक्षणं वर्णन करतात. ती अशी



दासबोधातून...

की, माझें घर माझा संसार। देव कैंचा आणिला थोर। ऐसा करी जो निर्धार। तो रजोगुण।।८।। माता पिता आणि कांता। पुत्र सुना आणि दुहिता। इतुकियांची वाहे चिंता तो रजोगुण।।९।। बरें खावें बरे जेवावे। बरें ल्यावें बरें नेसावें। दुसऱ्याचें अभिषाळावें। तो रजोगुण।।१०।।

रजोगुण वरचढ ठरला की मनुष्य माझे घर, माझा संसार, इथे थोर देव कोणता असे निर्धारपूर्वक बोलू लागतो. माता, पिता, मुलं सुना, नातवंडे यांचीच चिंता वाहतो. अशा माणसांची वृत्ती बरे खावे, बरे जेवावे, बरे ल्यावे, बरे नेसावे इतकीच असते असे नाही तर इतरांकडे असलेल्या वस्तूंची अभिलाषाही अशी माणसे बाळगतात. रजोगुणांची अशी अनेक लक्षणं आहेत. काळानुरूप या लक्षणांचा त्याग करून सत्त्व गुणांचा अंगिकार करावा, असं समर्थ सांगतात.

## का करावा शंखनाद?

भक्ती बोध

हिंदू धर्मामध्ये शंखाला वेगळं महत्त्व आहे. देवपूजेआधी शंख-घंटेची पूजा केली जाते. शुभकार्यावेळी शंखनाद करण्याची परंपरा आपल्याकडे प्राचीन काळापासून बघायला मिळते. प्रत्येकाच्या देवघरामध्ये शंख असतोच, मात्र शंखाची निवड करताना काही बाबींची दखल घ्यायला हवी. कारण शंखाची अचूक पारख झाली तर आपल्या मनोकामना पूर्ण होऊ शकतात. घरामध्ये उचित शंख असेल तर नकारात्मक ऊर्जा नष्ट होते. घरामध्ये दररोज शंखनाद केल्यास सकारात्मक ऊर्जेचा मार्ग मोकळा होतो. शंखध्वनीमुळे वातावणातील सूक्ष्म जीवाणूंचा नाश होतो. शंखामध्ये पंचतत्त्वांना संतुलित करण्याची क्षमता असते. म्हणूनच घरात शंख ठेवावा. शंखामध्ये पाणी भरुन त्याचं नियमित सेवन केल्यास हृदय आणि श्वासासंबंधीचे विकार नष्ट होतात असं संशोधक सांगतात. म्हणजेच वैज्ञानिक दृष्टीने शंखाचं महत्त्व सिद्ध झालं आहे. हाच शंख जन्मकुंडलीतील काही दोष निवारणार्थही उपयुक्त सिद्ध होतो. उदाहरणार्थ जन्मकुंडलीमध्ये सूर्य नीचेचा असेल तर वाईट फळाची शक्यता असते. जन्मकुंडलीतील हा दोष दूर करण्यासाठी प्रत्येक रविवारी दक्षिणावर्ती शंखामध्ये जल भरुन सूर्याला अर्घ्य द्यावं. धनाचा अभाव असेल तर घरात विष्णूशंख ठेवावा. या शंखाचा आकार अर्धचंद्राकार असतो. त्यामुळे त्याला चंद्रशंख देखील म्हणतात. हा शंख घरात असल्यास लक्ष्मीची कृपा राहते.



दक्षिणावर्ती शंख हा विशेष प्रकारचा शंख असतो. आकाशातील नक्षत्रमंडळामधील विशेष शुभ नक्षत्राच्या प्रभावाने समुद्रात या शंखाची उत्पत्ती होते. म्हणूनच या शंखाचा चमत्कारी प्रभाव दिसून येतो. मौल्यवान शंखामध्ये याचा नामोल्लेख करता येईल. दररोज शंखामध्ये पाणी भरावं आणि त्यासमोर श्री सूक्ताचं पठण करावं. नंतर हे जल घर, दुकान, ऑफिस अशा ठिकाणी शिंपडावं. यामुळे धनवृद्धी साधते.

## करु पिंपळाची पूजा

जाणून घ्या

सध्या निसर्गाचा बहर अनुभवायला मिळत आहे. वृक्षलता नवतेजाने बहरल्या आहेत. असं असताना केवळ पावसाळ्यातच नव्हे तर सर्वकाळ बहारदार दिसणारा वृक्ष म्हणजे पिंपळ. आपल्या धर्मात पिंपळाचं आगळं स्थान आहे. हा वृक्ष आपल्यासाठी शुद्ध आणि पूजनीय आहे. विश्व वृक्ष, चैत्य वृक्ष आणि वासुदेव या नावानेही हा वृक्ष ओळखला जातो. हिंदू धर्मानुसार या वृक्षाच्या मुळांजवळ ब्रह्मदेवाचा वास असतो, मध्यामध्ये विष्णूंचा वास असतो तर अग्रभागी शिव विराजमान असतात. म्हणूनच पिंपळाला देवतासमान पूजलं जातं. बरेच भाविक नियमितपणे पिंपळाची पूजा करतात. पिंपळाला पाणी घालतात. यामुळे मनोकामनांची पूर्ती होते. शत्रूंचा नाश होतो. त्याचबरोबर धनधान्य,



संपत्ती आणि संतानसुख मिळतं. या वृक्षाची पूजा ग्रहदोषांच्या निवारणार्थही केली जाते. हे दोष दूर करण्यासाठी अमावस्या आणि शनिवारी पिंपळाची पूजा करतात.

या पूजेमागे वैज्ञानिक कारणंदेखील आहेत. बहुसंख्य वृक्ष दिवसा ऑक्सिजनचं उत्सर्जन करतात आणि कार्बन डाय ऑक्साईडचं ग्रहण करतात. मात्र पिंपळ हा एकमेव असा वृक्ष आहे जो सदोदित ऑक्सिजनचं उत्सर्जन करत असतो. म्हणूनच या वृक्षाजवळ नेहमी शुद्ध वातावरण अनुभवायला मिळतं. साहजिकच या वृक्षाच्या सानिध्यात बरेच रोग दूर होतात आणि शरीर स्वास्थ टिकून राहतं. कदाचित हे लाभ मिळवण्यासाठीच पिंपळाच्या पूजेचं प्रयोजन असावं. धर्माने पिंपळाची पूजा शुभ फलदायी सांगितली आहे मात्र रविवारी पिंपळाला पाणी घालू नये असं शास्त्र सांगतं. यामुळे दारिद्र्य येतं असंही मानतात. पिंपळ कापू नये. ही कृती पितरांना कष्ट देणारी असते. जाणते-अजाणतेपणी ही कृती घडल्यास वंशवृद्धीमध्ये बाधा येते अशीही अनेकांची धारणा दिसते.

## कामेश्वर धाम

तीर्थक्षेत्र

भगवान शंकराने तिसरा डोळा उघडून कामदेवाला भस्म केलं होतं. हे घडलं ते स्थान उत्तर प्रदेशमधल्या बलिया जिल्ह्यात असल्याचं मानलं जातं. या स्थानाला कामेश्वर धाम असं म्हणतात. या स्थानाचं वर्णन शिवपुराणातही आढळतं. तसंच कामदेवाने ज्या आंब्याच्या झाडाच्या मागे लपून शंकरावर पुष्पबाण चालवले होते ते झाडही अर्धवट जळलेल्या अवस्थेत या ठिकाणी असल्याचं मानलं जातं. मातलेल्या तारकासुराचा वध करण्याच्या उद्देशाने समाधीस्त झालेल्या शंकराला जागृतावस्थेत आणण्याची जबाबदारी देवांनी कामदेवावर सोपवली होती. त्यामुळे कामदेवाने आंब्याच्या झाडामागे लपून शंकरावर पुष्पबाण चालवले. यामुळे शंकराची समाधी भंग पावली. संतापलेल्या शंकराने मग तांडवनृत्य करून तिसरा डोळा उघडला आणि कामदेवाला भस्म केलं. हे स्थान अत्यंत पवित्र मानलं जातं. अनेक साधूंनी, संतजनांनी कामेश्वर धामला भेट दिली आहे. त्रेतायुगात महर्षी विश्वामित्रांसह राम आणि लक्ष्मण इथे आले होते असं म्हणतात. दुर्वासमुनींनीही या स्थानी तप केला होता. इतरही अनेक महान ऋषी आणि संतसज्जनांनी या स्थानी तप केले आहेत. त्यामुळे या स्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. या ठिकाणी भगवान शंकर आणि कामदेवाच्या दगडात घडवलेल्या मूर्तीही आहेत.

कामेश्वर धाममध्ये तीन प्राचीन शिवलिंगं आहेत. तीन मंदिरांमध्ये या शिवालयाची स्थापना करण्यात आली आहे. रानीपोखराच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या आंब्याच्या झाडाखाली कामेश्वर नाथ शिवालय आहे. या स्थानी असलेलं शिकलिंग स्वयंभू असून ते खोदकामादरम्यान सापडलं होतं. श्री कमलेश्वरनाथ शिवालयाची स्थापना अयोध्येचा तत्कालीन राजा कमलेश्वरने केली होती. या ठिकाणी आल्यानंतर त्यांचा कुष्ठरोग बरा झाला होता, असं म्हणतात. या शिवालयाच्या जवळ त्यांनी तलावाची निर्मिती केली होती. रानी पोखरा असं या तलावाचं नाव आहे. बालेश्वरनाथ हे स्थान अत्यंत चमत्कारिक असल्याचं मानलं जातं. याबाबत एक आख्यायिका सांगितली



जाते ती अशी की १७२८ मध्ये अवधचा नवाब मोहंमद शाहने कामेश्वर धामवर हल्ला केला होता. त्यावेळी या शिवलिंगातून हजारो भुंगे बाहेर आले आणि शाहला पळता भुई थोडी झाली. त्यामुळे या शिवलिंगाचं महत्त्व वादातीत आहे.

# पाकिस्तानला स्वतःचीच खोड भोवली; भारतीय विमानांना हवाई क्षेत्र बंद केल्यामुळे 1,240 कोटी रुपयांचा महसूल बुडाला

**इस्लामाबाद, दि. १० वृत्तसंस्था**



भारत-पाकिस्तान तणाव निर्माण झाल्यानंतर पाकिस्तानने भारतीय विमानाना स्वतःच्या हवाई हद्दीत प्रवेश नाकारला होता. मात्र हवाई क्षेत्र बंद करून पाकिस्तानने स्वतःचेच नुकसान करून घेतले आहे. पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाला (पीएए) अवघ्या दोन महिन्यांत १,२४० कोटी रुपयांपेक्षा अधिकचा तोटा झाला आहे. पाकिस्तानमधील वृत्तपत्र डॉनने संरक्षण मंत्रालयाच्या अधिकृत निवेदनाच्या हवाल्याने ही बातमी दिली आहे.

२२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी भारताने सिंधू जल कराराला स्थगिती दिली. भारताच्या या निर्णयाला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांच्या विमानांना त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले.

डॉनच्या बातमीनुसार, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी माहिती दिली की, २४ एप्रिलपासून हवाई बंदी लागू केल्यामुळे देशाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याकाळात पाकिस्तानने भारतातील नोंदणीकृत विमाने, तसेच भारतीय विमान कंपन्यांकडून चालविण्यात येणारी विमानांना हवाई क्षेत्र बंद केले होते.

२४ एप्रिल ते ३० जून पर्यंत या बंदीमुळे दररोज १०० ते १५० विमान उड्डाणांवर याचा परिणाम झाला. तसेच पाकिस्तानच्या हवाई हद्दीतील वाहतूक जवळजवळ २० टक्क्यांनी घटली. यामुळे ओव्हरफ्लाइंग शुल्कातून होणारे पीएएचे उत्पन्न घटले, अशी माहिती डॉनच्या बातमीत देण्यात आली आहे.

दरम्यान, पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी हवाई क्षेत्राची बंदी २४ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. ही बंदी आता २४ ऑगस्ट रोजी पहाटे ४.५९ पर्यंत कायम राहिल. पीपीएने जारी केलेल्या एका पत्रकात म्हटले की, भारतीय नोंदणीकृत विमाने, भारतीय विमान कंपन्यांनी चालविलेले आणि तसेच भाडेतत्त्वावर घेतलेल्या विमानांना पाकिस्तानचे हवाई क्षेत्र उपलब्ध नसेल.

पाकिस्तानचे हवाई क्षेत्र बंद असले तरी भारतीय विमानांनी इतर आंतरराष्ट्रीय हवाई मार्गाचा वापर सुरू ठेवला आहे. तर पाकिस्तानच्या विमानांना मात्र अद्यापही भारताचे हवाई क्षेत्र उपलब्ध केलेले नाही. भारताचे नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री यांनी सांगितले की, पाकिस्तानच्या विमानांसाठी हवाई क्षेत्र २३ ऑगस्ट पर्यंत बंद राहिल.

# 'भारत एक मोठी शक्ती'

## अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाची ट्रम्प यांच्यावर टीका

**वॉशिंग्टन, दि. १० वृत्तसंस्था**

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर लावलेल्या टॅरिफवरून आता जगभरातून टीका केली जात आहे. एवढेच नाही तर अमेरिकेतील विचारवंत, अर्थशास्त्रज्ञही यावर संताप व्यक्त करत आहेत. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जेफ्री सॅक्स यांनीही ट्रम्प यांचा निर्णय अविचारी असल्याचे म्हटले.

जेफ्री सॅक्स म्हणाले, अमेरिकेतील राजकारण्यांना भारताची पर्वा नाही. भारत एक मोठी शक्ती आहे. चीनविरोधी क्वाडमध्ये अमेरिकेच्या बाजूने उभे राहून भारताला कोणताही सुरक्षात्मक फायद मिळणार नाहीये.

एका इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीमध्ये सॅक्स म्हणाले, "अमरिकेतील राजकारण्यांनी हे समजून घेतले पाहिजे. त्यांना भारताची काहीही पर्वा नाही. भारत ही एक मोठी शक्ती आहे, त्यांचे जगात स्वतंत्र स्थान आहे. चीनविरोधात अमेरिकेच्या बाजूने उभे राहून भारताला दीर्घकालीन सुरक्षितता मिळणार नाहीये. ट्रम्प टॅरिफबाबत जे काही करत आहेत, ते असंवैधानिक आहे."

भारतीय आयातीवर ५० टक्के टॅरिफ लावल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड यांनी गुरूवारी ओव्हल ऑफिसमध्ये म्हटले की, आयातशुल्काच्या समस्येचे निराकरण होत नाही तोपर्यंत दोन्ही देशांमधील कोणत्याही व्यापार चर्चेला सुरूवात होणार नाही.

**ट्रम्प स्वतःचा नाश करत आहेत**

अमेरिकेतील आणखी एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि जॉन हॉपिकन्स विद्यापीठाचे प्राध्यापक स्टीव्ह हँके यांनी ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. स्टीव्ह हँके म्हणाले, "ट्रम्प यांचा टॅरिफ वाढीचा निर्णय हा पूर्णपणे चुकीचा आहे आणि तो दीर्घकाळ टिकणार नाही. त्यांचे अर्थशास्त्र पूर्णपणे गंडले आहे. तसेच व्यापार युद्ध सुरू करून ट्रम्प स्वतःचा नाश करत आहेत."

# काठीच्या जोरावर गुराख्याची वाघाशी थरारक झुंज प्रसंगावधानामुळे वाचला जीव

**चंद्रपूर, दि. १० वृत्तसंस्था**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पळसगाव वनपरीक्षेत्रात गुराख्यांनी दाखवलेल्या धाडसामुळे एक मोठा अनर्थ टळला. जंगलात गुरे चारताना अचानक पट्टेदार वाघाने हल्ला चढवला. मात्र, प्रसंगावधान राखत गुराखी माधव गोसाई सोनवाणे यांनी हातातील काठीच्या साहाय्याने वाघाचा प्रतिकार केला आणि त्याला पिटाळून लावले. या घटनेत दोन गुराखी जखमी झाले आहेत.



पळसगाव येथील माधव सोनवाणे, सुभाष दडमल, हरिदास मोहुर्ले आणि मोकेश चौधरी हे चारही गुराखी जनावरांचा कळप घेऊन सरखाडोडा परिसरातील कक्ष क्रमांक २४१ मध्ये गेले होते. जनावरे चरत असताना दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक डरकाळी फोडत हल्ला करण्याचा प्रयत्न केला. गोंधळात दोन गुराखी – मोकेश चौधरी आणि हरिदास मोहुर्ले – जनावरांच्या गर्दीत जखमी झाले.

वाघाने नंतर थेट माधव सोनवाणे यांच्यावर झेप घेतली. मात्र, त्यांनी प्रसंगावधान राखत हातातील काठीने तीन वेळा जोरदार प्रहार केले. त्यांच्या या धाडसी प्रतिकारामुळे वाघ मागे हटला. या संघर्षात सुभाष दडमल यांनीही मदतीचा हात दिला आणि अखेर वाघाला जंगलात पिटाळून लावण्यात यश आले.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी व स्थानिक नागरिक घटनास्थळी धावले. जखमी गुराख्यांना तातडीने खासगी वाहनाने चिमूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले. गुराख्यांनी दाखवलेल्या धैर्याची परिसरात सर्वत्र चर्चा सुरू आहे. पळसगाव जंगलातील या घटनेने पुन्हा एकदा मानवी धाडस आणि प्रसंगावधानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. गुराख्यांनी दाखवलेल्या शौर्यामुळे मोठा अनर्थ टळला असून, त्यांच्या धैर्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# पाकिस्तानची सहा विमाने जमीनदोस्त

## लष्कराच्या शौर्याचे हवाई दलप्रमुखांकडून कौतुक

**बंगळूरु, दि. १० वृत्तसंस्था**

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारताने पाकिस्तानची पाच लढाऊ विमाने आणि एक मोठे विमान पाडले अशी माहिती हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी शनिवारी दिली. भारताने जमिनीवरून हवेत केलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा मारा असल्याचेही हवाई दलप्रमुखांनी स्पष्ट केले. या मोहिमेदरम्यान, भारताने अलीकडेच खरेदी केलेली 'एस-४०० हवाई संरक्षण यंत्रणा' निर्णायक ठरल्याचेही त्यांनी सांगितले.

बंगळूरु येथे सोळाव्या 'एअर चीफ मार्शल एल एम कात्रे स्मृती व्याख्यानमालेमध्ये एअर चीफ मार्शल सिंह यांनी 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान हवाई दलाच्या कामगिरीवर भाष्य केले. भारताने पाकिस्तानच्या भूभागात ३०० किलोमीटर अंतरावरून हे हल्ले केले गेले होते. या मोहिमेत भारतीय हद्दीत पाकिस्तानची मानवरहित विमाने (यूएव्ही), ड्रोन आणि काही क्षेपणास्त्रे पाडण्यातही भारताला यश आले असे हवाई दलप्रमुखांनी सांगितले. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने पाकिस्तानच्या हवाई तळांचे मोठे नुकसान केले होते. त्याविषयी बोलताना एअर चीफ मार्शल सिंह यांनी सांगितले की, विशिष्ट गोपनीय माहितीच्या आधारे हवाई दलाने पाकिस्तानच्या हवाई तळांवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हवाई तळ आणि जिथे नियोजन केले जाते त्या मुख्य इमारतीला लक्ष्य करण्यात आले.



**आम्ही 'एडब्ल्यूसी हँगर'मधील किमान एक 'हवाई इशारा आणि नियंत्रण प्रणाली' (एडब्ल्यूसीएस) आणि काही 'एफ-१६' विमाने पाडली. किमान पाच लढाऊ विमाने पाडली आहेत आणि एक मोठे विमान पाडले आहे. हा हल्ला आम्ही ३०० किलोमीटर अंतरावरून केला. हा खरे तर आतापर्यंत नोंदवलेला, सर्वात मोठा जमिनीवरून हवेत केलेला मारा आहे.**

**– एअर चीफ मार्शल ए. के. सिंह, हवाई दलप्रमुख**

# कॉनप्लेक्स सिनेमाजचा आयपीओ विक्रीसाठी खुला

कॉनप्लेक्स सिनेमाज लिमिटेड (कॉनप्लेक्स, द कंपनी) ही एक मनोरंजन क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून ती लक्झरी सिनेमा अनुभवावर लक्ष केंद्रित करून सिनेमा उद्योगात क्रांती घडवत आहे. कंपनीचा IPO (इनिशियल पब्लिक ऑफरिंग) विक्रीसाठी खुला झाला असून, NSE Emerge प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होण्यासाठी 90.27 कोटी (उच्च किंमत पट्टीनुसार) उभारण्याचा उद्देश आहे.या इशू अंतर्गत ५१,००,००० इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू करण्यात येणार असून, प्रत्येक शेअरचा दर्शनी मूल्य 10 आहे. किंमत पट्टा 168 ते 2177 प्रति शेअर दरम्यान निश्चित करण्यात आला आहे.या आयपीओतून मिळणाऱ्या रकमेचा उपयोग कॉर्पोरेट कार्यालय खरेदी, LED स्क्रीन आणि प्रोजेक्टर खरेदीसाठी आवश्यक भांडवली खर्च, कार्यकारी भांडवलाची गरज आणि इतर सामान्य कॉर्पोरेट खर्चासाठी केला जाणार आहे. अँकर गुंतवणुकीचा टप्पा ६ ऑगस्ट २०२५ रोजी खुले होणार असून, समभाग विक्री ११ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल.या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर बीलाइन कॅपिटल ॲडवायजर्स प्रायव्हेट लिमिटेड असून, रजिस्ट्रार एमयूएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आहे.




# मुथूट एक्सिमचे नालासोपारा येथे गोल्ड पॉइंट सेंटर सुरू



१३८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित उद्योग समूह मुथूट पप्पाचन ग्रुप (ज्याला मुथूट ब्लू म्हणूनही ओळखले जाते) यांची मौल्यवान धातू विभागातील शाखा मुथूट एक्सिम प्रा. लि. यांनी मुंबईतील नालासोपारा येथे त्यांच्या नवीन गोल्ड पॉइंट सेंटरच्या भव्य उद्घाटनाची घोषणा केली आहे. हे नवीन केंद्र मुथूट गोल्ड पॉइंट, दुकान क्र. ३, मीत अपार्टमेंट, सेंट्रल पार्क रोड, नालासोपारा ईस्ट, विरार, महाराष्ट्र येथे अतिशय उत्तम ठिकाणी स्थित आहे.

या उद्घाटनामुळे मुथूट एक्सिमचे मुंबईतील एकूण तिसरे आणि भारतातील एकूण ५७ वे गोल्ड पॉइंट सेंटर कार्यान्वित झाले आहे नालासोपारा येथे सुरू झालेले हे नवीन गोल्ड पॉइंट सेंटर स्थानिक नागरिकांच्या आर्थिक जीवनात परिवर्तनाची लाट घेऊन येईल. नागरिकांना आपल्या सोनेच्या मालमत्तांचे लिक्विडेशन (रोख रुपांतरण) करण्याची सुविधा या विश्वसनीय आणि पारदर्शक सेंटरमधून मिळेल, ज्यामुळे आर्थिक सेवा अधिक सुलभ आणि विश्वासार्ह होतील.मुथूट एक्सिमचे गोल्ड पॉइंट सेंटर्स हे पारदर्शक व्यवहार व ग्राहकांच्या विश्वासासाठी ओळखले जातात. या केंद्रांवर ग्राहक त्यांचे जुने आणि वापरलेले सोने विकू शकतात, आणि त्याला योग्य आणि निष्पक्ष मूल्यमापनाची खात्री दिली जाते. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने केली जाते, जिथे ग्राहक मूल्यांकनाची प्रक्रिया प्रत्यक्ष पाहू शकतात.१०,००० पर्यंतच्या सोन्यासाठी त्वरित रोख रक्कम देण्यात येते, तर त्यापेक्षा अधिक रकमेचे व्यवहार IMPS, NEFT किंवा RTGS च्या माध्यमातून सुरक्षितपणे पार पडतात, ज्यामुळे ग्राहकांना सुलभ आणि विश्वासार्ह अनुभव मिळतो.

## ब्लूस्टोन ज्वेलरी अँड लाइफस्टाइलच्या आयपीओसाठी ४९२/- ते ५१७/- पर्यंत किंमत पट्टा निश्चित




ब्लूस्टोन ज्वेलरी अँड लाइफस्टाइलच्या कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर ("आयपीओ" किंवा "ऑफर") सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २९ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर २९ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

ब्लूस्टोन ज्वेलरी अँड लाइफस्टाइल लिमिटेड त्यांच्या प्रमुख ब्रँड, ब्लूस्टोन अंतर्गत समकालीन जीवनशैली हिरे, सोने, प्लॅटिनम आणि स्टडेड दागिने ऑफर करते. ब्लूस्टोन ब्रँड २०११ मध्ये लाँच करण्यात आला आणि गेल्या काही वर्षांत तो आघाडीच्या ज्वेलरी रिटेलर्समध्ये एक आघाडीचा ब्रँड बनला आहे. हा एक डिजिटल फर्स्ट डायरेक्ट-टू-कंझ्युमर ("DTC") ब्रँड आहे जो ग्राहकांना एकसंध ओम्नीचॅनेल अनुभव सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करतो आणि आर्थिक वर्ष २०२४ मध्ये उत्पन्नाच्या बाबतीत भारतातील दुसरा सर्वात मोठा डिजिटल-फर्स्ट ओम्नी-चॅनेल ज्वेलरी ब्रँड आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत, भारतातील २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ११७ शहरांमध्ये २७५ स्टोअर्ससह संपूर्ण भारतात उपस्थिती असलेल्या काही आघाडीच्या ज्वेलरी रिटेलर्सपैकी एक आहे, जे संपूर्ण भारतात १२,६०० हून अधिक पिन कोड सेवा देतात.

**लोकार्थ**

# रीगल रिसोर्सेस लिमिटेडची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ रोजी उघडणार

रीगल रिसोर्सेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी ५ रु. प्रत्येक दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी ९६ रु. ते १०२ रु. किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १४४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ २१० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि प्रमोटर आणि प्रमोटर ग्रुप विक्री करणाऱ्या शेअरहोल्डर्सद्वारे ९४,१२,००० पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा मिश्रण आहे.कंपनीने घेतलेल्या काही कर्जांच्या पूर्ण किंवा अंशतः परतफेड आणि/किंवा पूर्व-पेमेंटसाठी १५९ कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यूमधून मिळणारा निधी वापरला जाईल.कोलकाता येथे मुख्यालय असलेले रीगल रिसोर्सेस हे भारतातील मका आधारित विशेष उत्पादनांच्या सर्वात मोठ्या उत्पादकांपैकी एक आहेत, गाळप क्षमतेच्या बाबतीत, ज्याची एकूण स्थापित गाळप क्षमता ७५० टन प्रतिदिन (टीपीडी) आहे, असे एफ अँड एस अहवालात म्हटले आहे.कंपनी स्थानिक मक्याचे स्टार्च आणि सुधारित स्टार्च - मक्यापासून तयार होणारे वनस्पती-आधारित नैसर्गिक स्टार्च तयार करते; सह-उत्पादनांमध्ये ग्लूटेन, जर्म, समृद्ध फायबर आणि फायबर यांचा समावेश आहे; आणि मूल्यवर्धित उत्पादने मक्याचे पीठ, आयसिंग शुगर, कस्टर्ड पावडर आणि बेकिंग पावडर सारखे अन्नपदार्थ दर्जाचे स्टार्च तयार करते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# ५ लाख देण्याचे आश्वासन अन् हातात पडले अवघ्या ५ हजारांचे धनादेश

## उत्तर काशीतील नागरिकांचा संताप

**उत्तरकाशी, दि. १० वृत्तसंस्था**



उत्तरकाशीतील धराली गावात झालेल्या ढगफुटीमुळे या भागात अचानक मोठी पूरस्थिती निर्माण झाली होती. या पूरात संपूर्ण गाव वाहून गेलं. इतकंच नाही तर, अनेक लोकांचा मृत्यू झाला. अनेकांची घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. या पूरबाधित लोकांना ५ लाखांची मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती. मात्र, पूरस्थितीच्या पाच दिवसानंतर शुक्रवारी बाधितांना तात्काळ मदत म्हणून अवघ्या ५ हजारांचे धनादेश देण्यात आले. इतक्या कमी रकमेचे चेक पाहून नागरिकांनी संताप व्यक्त केला. अनेकांनी ही मदत स्वीकारण्यास थेट नकार दिला.

एकीकडे इतका विनाश झालेला असतानाच, देण्यात आलेली रक्कम ही अत्यंत अपुरी असल्याचे लोक म्हणत आहेत. हा आमच्या दुःखाचाही अपमान असल्याचे लोकांनी म्हटले आहे. "आम्ही आमचे सर्वस्व गमावले आहे, आमची घरे, पैसे, व्यवसाय सगळं वाहून गेलं आहे. त्यामुळे ही रक्कम अपमानास्पद आहे", असे मत एका ग्रामस्थाने व्यक्त केले आहे. स्थानिक लोकांनी सांगितले की आपत्तीनंतर परिसरात वीज नव्हती, म्हणून त्यांना मेणबत्त्यांचे पाकिटे वाटण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. परंतु, त्या देखील चार दिवसांनंतर त्यांच्यापर्यंत पोहोचल्या. यावर प्रतिक्रिया देताना दुसऱ्या एका स्थानिक व्यक्तीने म्हटले की, "आम्ही ४ रात्री अंधारात घालवल्या. अन्न गरम करण्यासाठी आम्ही लाकडे जाळली. सरकार रेशनबद्दल बोलत आहे, पण तेही आमच्यापर्यंत पोहोचले नाही. अन्न शोधण्यासाठी आम्हाला घरोघरी भटकावे लागले." पर्यटकांची मन मोहून टाकणारी ही गावे आता मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करत आहेत. या स्थितीबद्दल बोलताना आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्याने सांगितले की ५,००० रुपयांचे धनादेश हे तात्पुरते उपाय होते आणि नुकसानीचे संपूर्ण मूल्यांकन अद्याप झालेले नाही.



**आज लालबागच्या राजाच्या चरणी उत्सव पूर्व आगमन वादन करण्यासाठी १२० ढोलताशा पथके आली. कुंदन भुजबळ आणि अशुतोष खरात यांच्या विरारच्या मार्तंड ढोल ताशा पथकानेही हजेरी लावली आणि आपल्या जबरदस्त वादन कलेने सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले.**

# नववीच्या विद्यार्थ्यांना आता पुस्तके समोर ठेवून परीक्षा देता येणार

## सीबीएसईचा महत्त्वाचा निर्णय

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने नववीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता नववीच्या परीक्षा Open Book पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. या निर्णयानुसार, परीक्षेवेळी विद्यार्थ्यांना त्यांची पुस्तकं, नोट्स आणि संदर्भ ग्रंथ सोबत ठेवण्याची आणि त्यांचा वापर करण्याची परवानगी असेल. या बदलामागे विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी करणे हा मुख्य उद्देश आहे. यापुढे केवळ पाठांतरावर भर न देता, संकल्पनांच्या स्पष्टीकरणावर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. "परीक्षेचं ताण कमी करून संकल्पनांच्या स्पष्टीकरणावर आता भर दिला जाणार आहे," असे मंडळाने स्पष्ट केले आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या पद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणेल अशी अपेक्षा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना विषयांची सखोल माहिती मिळण्यास मदत होईल आणि त्यांचे आकलन अधिक सुधारेल, असे बोलले जात आहे.

**काय आहे 'ओपन बुक' पद्धती?**

'ओपन बुक' परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळेस आपली पाठ्यपुस्तके, नोट्स आणि संदर्भग्रंथ सोबत ठेवण्याची मुभा दिली जाते. या पद्धतीचा उद्देश केवळ माहिती पाठ करून लिहिण्यापेक्षा विषयांच्या संकल्पना समजून घेणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि त्याचा योग्य उपयोग करणे या कौशल्यांचा विकास करणे आहे.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने स्पष्ट केले आहे की, "परीक्षेचा ताण कमी करून संकल्पनांच्या स्पष्टीकरणावर अधिक भर दिला जाणार आहे." याचा अर्थ असा की विद्यार्थ्यांनी विषय समजून घेतले आहेत का, हे तपासले जाणार आहे, आणि केवळ पाठांतरावर अवलंबून राहून गुण मिळवण्याची पद्धत मागे पडणार आहे.

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219